# शरद नगर

## 'एक स्वप्न'

• शरद पाटील

*Dream it*
*Believe it*
*Achieve it.*




SP
HOME'S
स्वप्नपूर्ती
कॉम्प्लेक्स
विघ्नेश्वर सदन : बुकींग सुरु आहे.




# ॥ स्वप्नपूर्ति गणपती बाप्पा मंदिर ॥

## शरद नगर, वाडा, जि.पालघर.


स्व. लक्ष्मीबाई यशवंत पाटील
संघर्ष मूर्ती स्वर्गीय मातोश्री
लक्ष्मीबाई यशवंत पाटील यांचे स्मारक

# शरद
# नगर

## ' एक स्वप्न '


✠ लेखक ✠

शरद यशवंत पाटील



✠ प्रकाशक ✠

यशलक्ष्मी पब्लीकेशन,
मशाल हाऊस, पहिला मजला,
यशवंत नगर, वाडा - ४२१३०३.



Ⓜ 9867011100, 9764511100

# SHARAD NAGAR : शरद नगर
# SHARAD PATIL : शरद पाटील

लेखक : प्रकाशक
शरद यशवंत पाटील

✠ प्रथमावृत्ती ✠
दिवाळी, दि. २१ ऑक्टोबर २०२५

किंमत : ५० रुपये मात्र



# अर्पण पत्रिका

विश्वास असतो लाखमोलाचा. तो कष्टाने कमवावा लागतो आणि सिद्धही व्हावा लागतो. आम्ही तो कमावला गुणवत्ता व सचोटीच्या बळावर. आमच्या भाग्यवान ग्राहकांना त्यांच्या पैशाचं परीपूर्ण मोल मिळावं आणि त्यांच्या स्वप्नांची खऱ्या अर्थाने पुर्तता व्हावी, हा आमचा प्रामाणिक अट्टाहास असतो.

म्हणूनच आमच्या प्रत्येक प्रकल्पात दिसते गुणवत्ता व व्यवहारात असते पारदर्शकता. त्यामुळेच आमचं ग्राहकांशी नातं तयार होतं अतुट विश्वासाचं व जिव्हाल्याचं.

माझ्यावर विश्वास ठेऊन शरद नगर मधे फ्लॅट घेणाऱ्या सर्व फ्लॅट धारकांना माझी ही छोटीशी कलाकृती विनम्र अर्पण.

■ शरद यशवंत पाटील,

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना ..... | ५ |
| २) | एसटी स्टँडवरचा पोरगा ..... | १४ |
| ३) | संकटांशी लढलो ..... | ३५ |
| ४) | ब्लॅकमनी ..... | ५० |
| ५) | स्वप्नपूर्ती बाप्पा ..... | ६५ |
| ६) | शरद नगर ने प्रेम कमावलं ..... | १०२ |
| ७) | गरीबांच्या स्वप्नातील घर ..... | १०९ |




# प्रस्तावना

" तू नको बांधू शरद नगर. जागा विकुन टाक. नाहितर तशीच ठेव. तुला कुणीही सहकार्य करणार नाही. उगीचच कशाला जीवाचा आटापीटा करतोस ? आता तुझे बरं चाललय ना ? काय होतं तुझ्याकडे ? आता सगळं आहे. मग जिथे कुणीच फ्लॅट घेणार नाही जिथे कशाला बिल्डींग बांधतोस ? " आई मला तिच्या भाषेत समजावत होती.

' शरद नगर ' च्या लाँचींगचा फज्जा उडाला होता. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर शुभारंभ करुन प्रोजेक्ट लॉन्च करायचा प्रयत्न मोठ्या धुमधडाक्यात करायचा होता. मात्र सर्वांना निमंत्रण देऊनही कुणीही कार्यक्रमाला आलं नव्हतं. आई व दोन्ही लहान मुलांच्या हस्ते नारळ वाढवून व बॅनरला हार घालून आमचा आम्हीच शुभारंभ उरकुन

घेतला होता. अक्षरशः फजीती झाली होती. माझ्या आयुष्यात अनेक वेळा निराशेचे क्षण आलेले असल्याने मला फारसे वाईट वाटले नव्हते. अनुभव होताच, पण आईला खुपच वाईट वाटले होते. तिच्या दृष्टीने मी कोणीतरी खुप मोठा आहे, त्यामुळे कार्यक्रमाला सर्वजण येतील. असा तिचा भ्रम होता. मात्र पुरताच भ्रमनिरास झाला होता. लोकांनी सपशेल माझ्या प्रोजेक्ट कडे दुर्लक्ष केलं होतं. या माळरानावर ‘ शरद नगर ’ उभं राहुच शकत नाही, असे त्यांना वाटत होतं आणि सर्वात महत्वाचं म्हणजे ‘ शरद नगर ’ हे नावच सर्वांना खटकत होतं. बाहेरुन आलेला कालचा पोरगा स्वतःच्या नावाचं नगर उभारतोय म्हणजे काय ? प्रस्थापितांच्या जखमेवरच मीठ चोळण्यासारखा प्रकार झाला होता. त्यामुळे कार्यक्रमाकडे कुणीही फिरकलं नव्हतं.

ऐनशेत रोडवरील वर्सीच्या माळावर

प्रोजेक्ट लाँचींग करताना घडलेला प्रसंग तिच्या जिव्हारी लागला होता. खरं तर बाजुलाच ऐनशेत गाव. तिचे माहेर. अर्थात माझ्या मामांचे गाव. पण गावातील सर्वांना निमंत्रण पत्रीका देऊनही कुणी आलं नव्हतं, हे तिच्या मनाला लागलं होतं. त्यातच प्रोजेक्ट लाँचींगच्या निमंत्रण पत्रीका पूर्ण शहरभर वाटल्यानंतर तिच्या कानावर आलेल्या प्रतिक्रीया खुपच विरोधात होत्या. " या उजाड माळरानावर नगर उभचं राहु शकत नाही. शहरापासुन लांब आहे. कुणीही फ्लॅट घेणार नाही." असं आणि बरंच काहीसं बोललं जात होतं. त्याचा परीणाम आईवर झाला होता, म्हणूनच ती मला समजावत होती. तिने खुप गरीबी बघीतली होती. आता कुठे चांगले दिवस आलेत तर पुन्हा मागे जायची तीची तयारी नव्हती. धंदा बुडेल, असे तिला वाटत होते.

मी आईचं बोलणं पूर्ण ऐकून घेतलं आणि

तिला सांगीतलं की, " आपल्या पूर्ण खानदानामधे कुणी पत्रकार होतं का? मी सुरुवात केली, यश मिळालं. मी सुरु केलेल्या सर्व व्यवसायांमधे मला कधीही अपयश आलेलं नाही. आता मला अनुभव आला आहे. लोकांचा विश्वासही कमावला आहे. त्यामुळे अपयश येणार नाही. धंदा बुडणार नाही. तसं वाटलचं तर मी प्रोजेक्ट थांबवेन," असे म्हणून आईची समजुत काढली. पण तिच्या चेहऱ्यावरचे निराशेचे भाव मला स्पष्ट दिसत होते. कळायला लागल्यापासुन प्रत्येक गोष्टीचं उद्घाटन, भूमीपुजन किंवा कार्यक्रमांची सुरुवात आईच्याच हस्ते करत होतो. तिचे हात पवित्र होते. मला यश मिळत होतं. मात्र प्रोजेक्टचा शुभारंभ झाल्यानंतर तत्काळ आईने सांगीतलेल्या गोष्टी मनामधे चलबिचल निर्माण करत होत्या.

काय करावं मोठा प्रश्न होता. इतरांनी कुणी

सांगीतलं असतं तर ऐकलं नसतं पण आईनेच सांगीतल्याने विचार करायला भाग पाडलं होतं. मात्र ती जागा विकुन फारसे पैसे मिळणार नव्हते. आधीही मी आर्थिक अडचणीत सापडल्यानंतर ही जागा विकण्याचा मी प्रयत्न केला होता. जागा शहरापासुन काहिशी लांब, उजाड, ओसाड माळरान व काहिसा जंगली भाग असल्याने कुणीही जागा घ्यायला तयार नव्हते. शहरातीलच व्यापारी मित्र विकास पातकर यांना ही जागा फक्त ११ लाखांमधे द्यायला काढली होती मात्र त्यांनी प्रत्यक्ष जागा बघीतल्यानंतर स्वस्तामधे मिळालेली जागाही घ्यायला नकार दिला होता. त्यामुळे दुसरा कुणी ग्राहक मिळेल याची खात्री नव्हती. म्हणूनच जे व्हायचे ते होईल पण शरद नगर उभारायचेच असा निर्धार करुन आईला समजावले व कामाला लागलो. “ जाऊन जाऊन आपले काय जाणार?

आपल्याकडे होतेच काय? " हा नेहमीचाच मंत्र पाठीशी होताच. त्यामुळे नकारात्मक विचार सोडून ' शरद नगर ' उभारण्याचा निर्धार केला व कामाला सुरुवात केली.

शरद पाटील जोमाने कमाला लागलाय, जाहिरातही मोठ्या प्रमाणावर केली जातेय, हे पाहुन भूमीपुजनाला मात्र मोठी गर्दी झाली. जवळचे कुणी आले नव्हते पण ओळखीचे व माझ्यावर विश्वास असलेल्या अनेकजणांनी उपस्थिती लावल्याने आईच्या चेहऱ्यावरचा आनंद स्पष्ट दिसत होता. प्रोजेक्ट लाँचींग ते पहिल्या बिल्डींगचे भूमीपुजन या काळावधीमधे मी माझं विक्री कौशल्य पूर्णतः पणाला लावलं होतं. मार्केटींग मधे कुठेही कमी पडलो नव्हतो. त्यामुळे ' राजलक्ष्मी कॉम्प्लेक्स ' या पहिल्या बिल्डींगचा भूमीपुजन सोहळा चर्चेचा विषय बनला होता. सर्वांना उत्सुकता वाटत होती.

त्यातच मी वाडा तालुक्यातील ठुणावे रोडवरील खडकाळ जागेमध्ये यशस्वीपणे एक फार्म हाऊस उभारला होता. शहरापासुन लांब असलेल्या परळी नाक्यावरील यशवंत नगरमध्ये जेव्हा तिथे काहीही नव्हतं तेव्हा ' यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स ' उभारला होता. या सर्वांची चर्चाही झाली आणि ' शरद पाटील नगर उभारु शकतो ' अशी सकारात्मक चर्चा सुरु झाली.

आपण कुठलंही काम करायला घेतलं की लोकं आधी दुर्लक्ष करतात. मात्र आपण यशाकडे पोहचायला लागलो की चांगली चर्चा करतात. तशीच सकारात्मक चर्चा सुरु झाली आणि फ्लॅट विक्री व्हायला सुरुवात झाली. वाडा शहरामधे ज्या किंमतीला कुणीच फ्लॅट देऊ शकत नव्हते तेवढ्या कमी किमतीला आम्ही फ्लॅट विकु लागलो. गुणवत्तेमधे कधीही तडजोड केली नाही.

प्रत्येकाशी सहकार्याचीच भूमीका घेतली. त्यामुळे एकापाठोपाठ एक बिल्डींग उभ्या राहत गेल्या. कोरोना - लॉक डाऊनचा काळ वगळला तर आजपर्यंत कधीही बांधकाम थांबलेले नाही.

आई, आधी नको म्हणत होती, मात्र एक - एक बिल्डींग उभी राहताना पाहुन प्रचंड आनंदित होत होती. ‘ शरद ने करुन दाखवलं ’ असं ती अभिमानाने सांगत होती. शरद नगर हे आईचा स्वाभिमान होता. म्हणूनच तिच्या निधनानंतर शरद नगरच्या प्रवेशद्वारामधे ‘ संघर्षमूर्ती स्वर्गीय लक्ष्मीबाई यशवंत पाटील ’ या नावाने पुतळा बसवला. हा वाडा शहरातील पहिलाच पुतळा होता. आज पर्यंत कुठल्याच मुलाने आपल्या आईचा पुतळा बसवला नव्हता. आम्ही मात्र तिचे कायमस्वरुपी स्मृतीस्थळ बनवले. शरद नगरमधे प्रवेश करतानाच आईच दर्शन होते. तिच्या

बोलण्याची आणि जिथे काहीच नव्हतं तिथे कसं शरद नगर उभं केलं ? याची आठवण येते.

‘ शरद नगर ’ हे माझं स्वप्न होतं. माझ्यासाठी अशक्यप्रायही होतं. मात्र स्वप्नपूर्ती गणपती बाप्पाच्या आशिर्वादाने व आई - वडीलांच्या पुण्याईने ते उभं राहिलं. शरद नगर कसं उभं राहिलं ते माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्वांना कळावं यासाठीच हा छोटेखानी पुस्तक प्रपंच. आजपर्यंत माझ्या लिखाणावर, बोलण्यावर आपण भरभरुन प्रेम केलतं तसचं या पुस्तकावरही कराल, हीच अपेक्षा.

■ शरद यशवंत पाटील,
संस्थापक
शरद नगर, वाडा.

# एस.टी. स्टँडवरचा पोरगा ते ‘ शरद नगर ’ चा संस्थापक

**कुछ पाने के लिए,**
**बहुत कुछ खोना**
**पडता हे !!**

“ या जगामधे सर्व काही शक्य आहे, पण ते मिळवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. अविरतपणे प्रयत्न करताना खुप काही गमवावे लागते. अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो. ठार बहिरे होऊन कामाला जुंपून घ्यावे लागते. अहंकार बाजुला ठेवावा लागतो आणि जे पडेल ते काम करण्याची तयारी ठेवावी लागते. मन मारुन जगावे लागते आणि निश्चित ध्येयाने प्रेरीत होऊन झपाटल्यासारखे काम करावे लागते.

एक स्वप्न डोळ्यासमोर ठेवून चालावे लागते," या सर्व गोष्टींची कल्पना शालेय वयातच आली होती आणि थोरा - मोठ्यांची चरित्रे सातत्याने वाचल्याने मोठे व्हायचे असेल तर यशस्वी माणसांच्या पावलांवर पाऊल ठेवूनच पुढे जावे लागेल, असे निश्चित केले होते. त्यामुळे जे काही सोसावे - भोगावे लागेल ते सोसू पण गरीबीत मरणार नाही, असा ठाम निर्धार होता.

"गरीबीत जन्माला आलात तर तो तुमचा दोष नाही, मात्र गरीबीतच मेलात तर त्याला तुम्हीच जबाबदार आहात," या अर्थाचे सुभाषित लहानपणापासुनच कानावर पडत होते. ते पटण्यासारखेच होते. म्हणूनच दारीद्र्यावर मात करुन स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे राहायचे, असे शालेय वयातच ठरवले होते. इयत्ता ७ वी पिक, ता. वाडा या प्राथमिक शाळेतून चांगल्या

गुणांनी उत्तीर्ण केल्यानंतर डहाणू येथील शासकीय वसतीगृहामधे प्रवेश मिळाला होता. तिथे जाताना घरुन सोबत दिलेल्या मोडक्या पेटीच्या आतल्या कप्प्यावर वहीच्या कागदावर लिहून चिकटवलेले वरील सुभाषित रोज नजरेत पडत होते. मोठे होण्याचा निर्धार तेव्हापासूनच झाला होता. इयत्ता ७ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण हॉस्टेलमधे राहूनच झालं. त्यानंतर २ वर्षांचा कृषी डिप्लोमा कोसबाड येथे हॉस्टेलमधे राहुनच पुर्ण केला. त्यानंतर गावी पिक येथे आलो. गरीबी पाचवीला पुजलेली होती. त्यामुळे माझ्याकडून घरच्यांच्या खूप साऱ्या अपेक्षा होत्या. त्यावेळी कृषी कोर्स केल्यानंतर कृषी सेवक, ग्रामसेवक वा इतर नोकऱ्या मिळत होत्या. माझ्या वर्गातील मुलं नोकरीसाठी प्रयत्न करत होती. काहींना नोकऱ्या मिळाल्याही होत्या. मी मात्र नोकरी करणार नाही, असे घरात सांगितल्यानंतर सर्वजण

वैतागले. खरं तर, मी नोकरीला लागेन व घरची परीस्थीती सुधारेल, या आशेवर सर्वजण होते. पण नोकरीला नकार देताच घरात मचमच सुरु झाली. मग घर सोडायचे ठरवले.

मला नोकरीमधे अडकणे परवडणारं नव्हते. नोकरी करायची अजीबात इच्छा नव्हती. नोकरी म्हणजे काय? याचा पूर्ण अभ्यास केला होता. म्हणूनच व्यवसायाला सुरुवात करायची आणि नाही जमले तर तिन वर्षांनी म्हणजे सुमारे १००० दिवसांनी नोकरीकडे वळायचे, असे ठरवले होते. म्हणूनच पिक गावातून निघताना घरातून काहीही न घेता अंगावरच्या कपड्यांनिशी बाहेर पडलो. हातामधे कृषी डिप्लोमाला जाताना घरातून दिलेली दोन जर्मनची टोपं व एक ताट तेही जर्मनचेच एक कापडी पिशवीमधे टाकले होते. पिक गावामधे त्यावेळी एस.टी. येत नव्हती. म्हणून जंगलातल्या

डाहे फाटा या मधल्या रस्त्याने चालत येऊन वाडा शहर गाठले. कुठे जायचे ? काय करायचे ? काही ठरलेलं नव्हते. फक्त 'पडेल ते काम' करायची तयारी होती. वाडा एस.टी. स्टँडवर पोहोचताच हातातील कापडी पिशवी स्टँडवरील बसण्याच्या लाकडी फळ्यांखाली ठेवली आणि शहरात फेरफटका मारला.

व्यवसायात उतरायचे तर शहरातील मोठ्या व्यवसायीकाकडेच कामाला लागायचे, तरच अनुभव मिळेल म्हणून मोठ्या व्यापाऱ्यांकडे लक्ष ठेवून होतो. पूर्ण शहर फिरुन झाल्यानंतर पुन्हा स्टँडवर आलो. एस.टी. स्टँड शेजारीच 'विकास वाईन्स' नावाचे दारुचे दुकान होते आणि या दुकानासमोर एका भैय्याची केळ्याची गाडी होती. दोघे म्हातारे नवरा - बायको केळी विकत होते. त्यांच्याकडे जाऊन थेट विचारले 'काम मिळेल का ?

मी तुमच्या जोडीला केळी विकेन.' त्यांना आश्चर्य वाटले पण त्यांनी होकार दिला. 'चलेगा हिसाब संभाल,' असे म्हणून त्यांनी मला त्यांच्यासोबत उभे केले. अनुभव नवा आणि पहिलाच होता. पण सुरुवातीला पोटापाण्याची व्यवस्था करणे गरजेचे होते. पैसे नाही मिळाले तरी केळी खायला मिळतील. भूक भागेल, असा विचार त्यामागचा होता.

पहिलाच दिवस संपला होता. राहायचं कुठे ? हा प्रश्न होताच. म्हणून पुन्हा स्टँडवर गेलो. शेवटची एस.टी. गेल्यानंतर रात्री स्टँड सामसुम झाले. स्टँडवरच्या शौचालयातच फ्रेश झालो आणि स्टँडवरच्या फळ्यांवरच झोपलो. सकाळची पहिली ५ ची एस.टी. आली तेव्हा उठून पुन्हा त्याच शौचालयात जाऊन कशी – बशी अंघोळ उरकली आणि स्टँडपासून जवळच असलेल्या 'विकास टी हाऊस' मधे चहा प्यायला गेलो. तिथे त्या हॉटेलचे

मालक विकास कुशाभाऊ ठाकरे हेच गल्ल्यावर होते. त्यांनी, ''तु ऐनशेतवाल्यांचा भाचा ना ? कृषी कोर्स केला आहेस ना ? मग त्या भैय्याकडे केळ्यांच्या गाडीवर काय करतोस ?'' असे विचारुन मी काही बोलायच्या आतच त्याने हॉटेल समोरील किराणा दुकानाकडे बोट दाखवून, ''मिलनला कृषीचे दुकान टाकायचे आहे. तो खते - औषधे विकतो. तुझी तयारी असेल तर बोल, मी बोलतो त्याच्याशी.'' असे म्हणताच मी तत्काळ होकार दिला. ''अगर किसी चीज को दिल से चाहो तो पुरी कायनात उसे तुमसे मिलाने मे लग जाती है,'' याचा प्रत्यय मला येत होता.

विकास ठाकरे हे मला घेऊन 'मधुकर सखाराम पातकर' यांच्या किराणा दुकानात गेले. तेथे मिलन पालकर यांच्याशी ओळख करुन दिली आणि, ''याने कृषी कोर्स केलाय. हुशार आहे. तुला

माणूस पाहिजे होता ना. ठेव याला," असे सांगितले. मिलननेही तत्काळ होकार दिला. एका लाकडी कपाटामध्ये ठेवलेली कृषीची औषधे दाखवली आणि खताचे गोडाऊन दाखवून दुसऱ्या दिवसापासून यायला सांगितले. खुप बरं वाटलं. एक तर तो व्यापारी मोठा होता. व्यवसायाचा अनुभव मिळेल आणि ज्या कृषी चा अभ्यास केला तेच काम मिळाले याचा आनंद झाला. मिलन पातकर आणि त्यांच्या वडिलांची भेट घेऊन पुन्हा केळीच्या गाडीवर आलो. संध्याकाळपर्यंत काम केलं, त्यांना उद्यापासून येणार नाही, म्हणून सांगितले आणि पुन्हा एस.टी. स्टँड गाठले.

काल रात्रभर एस.टी. स्टँडवर झोपलेला पोरगा आज पुन्हा आलाय हे पाहिल्यावर तेथील कंट्रोलर रामचंद्र पटारे (मोज) यांनी मला तेथून हाकलले आणि, 'ही काय झोपायची जागा आहे

का ?' असे बरेच काही बोलून दम भरला. मी तेथून निघालो. शहर फिरलो. कंट्रोलर झोपायची वाट पाहिली आणि ते झोपले आहेत असे पाहून स्टँडवरच्या फळ्यांवर न झोपता फळ्यांखाली झोपलो. सकाळी पहिली गाडी यायच्या आत उठून फ्रेश होऊन पातकरांचे दुकान उघडण्याच्या आत त्यांच्या दुकानासमोर जाऊन उभा राहिलो. दुकान उघडताच कामाला सुरुवात केली. ती दुकानात साफसफाई करायला. ते किराणा मालाचे मोठे दुकान होते. कामगारही बरेच होते. माझ्याकडे औषधे व खते विकण्याचे काम होते, पण ग्राहक नसताना मी किराणा दुकानामधे काम करायचो. त्या दुकानात सामनाच्या पुड्या बांधताना मला अनेकांनी पाहिले आहे. त्यामुळे आजही माझ्यावर टिका करताना विरोधक 'किराणा मालाच्या दुकानात पुड्या बांधणारा,' एवढा मोठा कसा झाला ? एवढा पैसा

कुठून आला ? असे विचारतात. काहीजण तर हा हमाली करायचा, याच्याकडे एवढा पैसा कसा आला ? असेही विचारतात.

मी कामाला लागल्यानंतर मिलन पातकर यांनी दुकानात एका छोट्याशा कोपऱ्यात शेतीची औषधे विकण्याचे एक नवे दालन सुरु केले, पातकर फर्टीलायझर्स या नावाने. या दुकानाचा प्रचार – प्रसार करण्यासाठी मी जीवाचं अक्षरशः रान केलं. गावा – गावात जाऊन पायी फिरुन दुकानाचा प्रचार करणारी पत्रके वाटली. शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन रोगांवरील औषधांची माहिती देऊन औषधे विकली. कुठलेही काम मेहनतीने व प्रामाणिकपणे करण्याची तयारी होती. सिझनमधे खताची विक्री मोठ्या प्रमाणावर व्हायची 'पातकर फर्टीलायझर्स' चा मी एकमेव कर्मचारी असल्याने शेतकरी खत घेण्यासाठी आल्यानंतर

पावती बनवायची, पैसे घ्यायचे आणि शेतकऱ्याने सोबत आणलेल्या हमालाच्या डोक्यावर खताच्या गोणी उचलून द्यायच्या, हे माझे रोजचे काम. मला खताच्या गोणी हमालांच्या डोक्यावर उचलून देताना सर्वजण पाहत होते. त्यामुळे नव्याने येणाऱ्या प्रत्येकालाच मीही हमालीच करतोय. असे वाटत होते. बोलणाऱ्यांची संख्या वाढत होती. कधी लोकं मला दुकान साफ करताना, दुकानात झाडू मारताना, कधी सामनाच्या पुड्या बांधताना तर कधी खताच्या गोणी हमालांच्या डोक्यावर उचलून देताना पाहत होते. ज्यांनी मला ज्या रुपात पाहिले तेच त्यांच्या लक्षात राहिले. मी मात्र अनुभव घेत होतो. वर जाण्याची 'शिडी' शोधत होतो. हे सर्व करताना लिखाण काम सुरुच होते. म्हणजे पत्रकार म्हणून मी काम करतच होतो.

दुकानात काम मिळाल्याने आणि दुकान

स्टँडजवळ असल्याने लोकांशी संपर्क वाढला होता. पत्रकारीता हाच माझा मोठा आधार होता. पत्रकारीतेमुळेच मला मोठे होता येणार होते. त्यासाठी मी मार्ग तयार करत होतो. स्टँडवर कंट्रोलर झोपू देत नव्हते आणि शौचालयामधे अंघोळ करणे असाह्य झाले होते. पुन्हा एकदा देवाला दया आली. बरोबर नवव्या दिवशी एस.टी. स्टँडवर मी हमालांच्या बरोबर एस.टी.च्या टपावर गोणी चढवून द्यायला गेलो असताना उभा होतो. तेथे माझे मामा भेटले. स्व. विष्णू ठाकरे मामा. यांनी माझी विचारपूस केली. मी त्यांना, 'नोकरी करतोय, पत्रकार फर्टीलायझर्स मधे,' असे सांगितले. कुठे राहतोस ? विचारल्यावर मित्राकडे, असे ठोकून दिले. त्यांनी बहुदा ओळखलं असेल किंवा त्यांना माहित झालं असेल. त्यांनी सांगितलं की, "ऐनशेत ला रहा. जाऊन – येऊन कर." पडत्या फळाची आज्ञा मानून

होकार दिला आणि एस.टी. स्टँडवरचे 'बिऱ्हाड' हालवलं. थेट ऐनशेत गाठलं. राहायची सोय झाली होती. ज्याच्याकडे राहयची सोय असते तो काहीही करु शकतो, हे अनेक थोरा - मोठ्यांनी दाखवून दिलं होतं. मीही हात - पाय मारायच्या तयारीत होतो.

व्यापाऱ्याच्या दुकानामध्ये काम करण्याचा अनुभव होता. त्या बळावर छोटासा का होईना पण व्यवसाय सुरु करावा. असे ठरवले आणि वाडा एस.टी. स्टँड जवळ असलेल्या एका टपरीवर अंडी व चिकन विक्री सुरु केली. तिथेच अनेक सिझनेबल धंदे सुरु केले. दिवाळीला ग्रीटिंग्ज, आकाश कंदील, रांगोळ्या विकायचो. रक्षाबंधनला राख्यांचे दुकान टाकायचो. प्रत्येक सणाला नवीन व्यवसाय. ते करताना पत्रकारीता सुरुच होती. सकाळी कॉलेजला जाणेही सुरु होते. एकाच वेळी बऱ्याच गोष्टी करत

होतो. आलेल्या प्रत्येक संकटाला तोंड देत होतो. बरोबर तिन वर्ष उलटायला आली होती. 'रस्त्यावरचा व्यवसाय' करुन त्यातच अडकून पडण्यासारखी परीस्थीती निमार्ण झाली होती. घरच्यांच्या दृष्टीने, नातेवाईकांच्या नजरेतून हास्यास्पद ठरलो होतो. सरकारी नोकरी मिळत असताना केली नव्हती. नोकरी करणार नाही म्हणत एक छोटीशी नोकरी पत्कारली होती. त्यानंतर स्टँडवर छोट्या – छोट्या गोष्टी विकत होतो. हातात काहीही नसतानाही श्रीमंतीच्या बाता मारल्या होत्या. त्यामुळे जे नोकरीला लागले होते, ते चांगला पगार घेऊन जाता – येता हिणवत होते. पण मी धीर सोडला नव्हता. योग्य वेळेची, योग्य मार्गदर्शनाची आणि योग्य संधीची वाट पाहत होतो.

छोट्या – मोठ्या व्यवसायाबरोबरच पत्रकारीतेमधेही नावलौकिक वाढला होता. सलग

तिन - चार वर्ष एसटी स्टँडवरच घालवल्याने ओळखी वाढल्या होत्या. त्याचाच फायदा घेत 'उड्डाण भरायचं' ठरवलं आणि १९९४ मधे वयाच्या २३ व्या वर्षी स्वत:च वृत्तपत्र 'शब्द मशाल' या नावाने सुरु केले. वाडा शहरात येताना पिक येथून चालत आलो होतो. दि. ८ मे १९९४ ला त्याच शहरात एका दिमाखदार सोहळ्यामधे 'शब्द मशाल' हे वृत्तपत्र सुरु केले आणि एकच दिवसात बोलणाऱ्यांची तोंड बंद झाली. एका छोट्याशा शिंदे चालीतील रुममधे कार्यालय काढून सुरु केलेलं 'शब्द मशाल' हे वृत्तपत्र अनुभवाच्या जोरावर घरा - घरात पोहोचलं व त्याच आधारावर नव - नवीन व्यवसाय चांगल्या पद्धतीने करायला सुरुवात केली.

वाडा शहरामधे आल्यानंतर विश्वास कमावला होता. हा मुलगा प्रमाणिक आहे, मेहनती आहे आणि सर्वात महत्वाचं म्हणजे धाडसी आहे,

असं सर्वांना वाटत होते. त्यामुळे पत्रकारीतेमध्ये बऱ्यापैकी जम बसला. तेव्हा केलेला संघर्ष आज फळाला आला असला तरीही त्यावेळी ज्यांनी मला ज्या - ज्या अवस्थेमध्ये पाहिलं त्या अवस्थेतील 'शरद पाटील' चे वर्णन ते आजही करतात. विशेषत: विरोधक टिकाकार आज जरी मी कुठल्याही पदावर असलो तरीही, त्याच्याकडे काय होतं? हा हमाली करत होता. किराणा दुकानामधे पुड्या बांधीत होता. रस्त्यावर कटलरी विकत होता, तरीही हा बिल्डर कसा झाला? याचे एवढे धंदे कसे उभे राहिले? एवढा पैसा कुठून आला? असे प्रश्न विचारतात तेव्हा खुप बरं वाटते. मी श्रीमंत घरात जन्माला आलेलो नव्हतो तर मी प्रचंड गरीबीतून आलोय, याची जाणीव होते. मी जे काही मिळवले ते शून्यातून मिळवलं, याचा अभिमान वाटतो. त्यामुळे मी टीकाकारांना उत्तर देत नाही, तर ते खरंच

बोलतात, असे सांगून त्यांना धन्यवाद देतो.

दि. ८ मे १९९४ रोजी ‘शब्द मशाल’ हे स्वतःच्या मालकीचे वृत्तपत्र सुरु केल्यानंतर मागे वळून पाहिलेच नाही. येणाऱ्या प्रत्येक संकटाला अंगा- खांद्यावर खेळवत पुढे जात राहिलो. कुठल्याही प्रसंगाने थांबलो नाही. प्रत्येकाच्याच मनामध्ये एक ‘हिडन अजेंडा’ असतो. सुप्त हेतू वा उद्देश तो अंतः करणामध्ये बाळगून असतो. तो इतरांना दिसून येत नाही, मात्र त्या दृष्टीने त्याची पावलं बरोबर पडत असतात. मी माझा हेतू गरीबीवर मात करण्याचा जाहीर बोलून दाखवत होतो, मात्र नेमकं काय करायचं ते सांगत नव्हतो. जेव्हा संधी मिळाली तेव्हा स्वप्न जाहीर केलं आणि स्वतःच्या मोठ्या व्यवसायांचा पसारा वाढवला. त्यातीलच एक स्वप्न होते, वाडा शहरामध्ये स्वतःच्या नावाचं नगर उभारायचं. १९९० पासून स्वप्न पाहत होतो.

त्यासाठी बिल्डर व्यवसायामधे २००० साली उतरलो पण प्रत्यक्षात शरद नगरच्या उभारणीस २०११ मधे सुरुवात केली. १९९० ते २०११ हा तब्बल २१ वर्षांचा कालावधी फक्त स्वत:ला घडवण्यात गेला. त्यानंतरची १४ वर्ष पाहिलेलं स्वप्न साकारण्यात गेली. तेव्हा कुठे २०२५ ला शरद नगर खऱ्या अर्थाने नावारुपाला आलं आणि मला तब्बल ३५ वर्षानंतर शद नगरचा संस्थापक हा बहुमान मिळाला.

या ३५ वर्षांमधे जे काही अनुभवलं, भोगलं ते प्रचंड होतं. मात्र डगमगलो नाही. मागे फिरलो नाही की मागे वळून पाहिलं नाही. माझी कुणाशीच स्पर्धा नव्हती. फक्त स्वत:ला सिद्ध करण्याची धडपड सुरु होती. त्यामुळे जे - जे घडतेय त्याला सामोरे गेलो. गमावण्या सारखं काहीच नव्हते. पिक वरुन येताना दोन टोपं आणि एक ताट तेही जर्मनचे घेऊन आलो होतो. त्या व्यतिरीक्त कुठलचं भांडवल

नव्हतं. म्हणून भीती कधीच वाटली नाही. त्या बळावरच शरद नगरची पायाभरणी झाली. शून्यातून स्वतःची ओळख निर्माण केली. गरीबीवर मात करण्याचे स्वप्न होते. गरीबीतच मरायचं नव्हतं. खूप श्रीमंत झालो नव्हतो पण गरीबही राहिलो नव्हतो. त्यामुळे तेही स्वप्नं पूर्ण झाले. एस.टी. स्टँडवरच्या ज्या शौचालयात ९ दिवस अंघोळ करायचो, त्याच शौचालयाच्या बाजूला असलेल्या इमारतीमधील वाडा सेवा सहकारी सोसायटीचा आज मी चेअरमन आहे. २४ गावांचे प्रतिनिधीत्व करतोय. ज्या बिल्डरांकडे मजूर म्हणून काम केले त्याच बिल्डर असोशियनचा अध्यक्ष आहे आणि शहरामधे आलो तेव्हा स्वतःला झोपण्यापूर्तीही जागा मिळाली नव्हती, मात्र आज शेकडो लोकांच्या निवाऱ्याची व्यवस्था केली आहे.

हे यासाठी सांगतोय की, शरद नगर सहज

उभे राहिलेले नाही. यामधे प्रचंड परिश्रम, त्याग, समर्पण आणि बरेच काही आहे. म्हणूनच प्रत्येक ग्राहकाची मला जाणीव आहे. नगरामधे राहणाऱ्या प्रत्येकाच्या प्रति आदराची भावना आहे. 'शरद नगर' हे माझं स्वप्न होतं. ते स्वप्न पूर्ण केल्याचा आनंद आहे. आपल्या खिशामधे एकही रुपया नसताना एक भले मोठे स्वप्न पाहणे आणि ते पूर्ण करण्यासाठी सर्वस्व पणाला लावणे ज्याला जमत तोच ते स्वप्न पूर्ण करु शकतो. मात्र त्यासाठी 'वाट्टेल ते' आणि 'पडेल ते' काम करण्याची तयारी पाहिजे.

सुरुवातीला लोकं नाव ठेवीत होती, तीच लोकं आता मोठ्या आदराने नाव घेतात. खताच्या गोणी उचलताना ओळख दाखवायला जी लोकं तयार होत नव्हती तीच आता दूर - दूरची नाती सांगून शरद पाटील आमचे नातेवाईक आहेत, असे

अभिमानाने सांगतात. पूर्णतः परीस्थीती पालटून टाकायची धमक ठेवली आणि म्हणूनच यश मिळत गेलं. ज्यांनी जे सांगितले ते - ते मी मान्य केले. आरोपांना उत्तर देत बसलो नाही. त्यांच्या नादाला लागून वेळ घालवला नाही. त्यांना प्रत्यक्ष कृतीमधून उत्तर दिले. आजही, 'शरद पाटील' कोण होता, मला माहित आहे? असे सांगणारे अनेक आहेत, त्यांनी सांगण्यापेक्षा मीच माझ्या लिखाणातुन, भाषणांमधुन अनेक वेळा सांगितले की, "मी रस्त्यावरचा पोरगा होतो. मी शून्य होतो, माझ्याकडे गमावण्यासारखं काहीही नव्हतं," पण तेच माझं खरं भांडवल होतं.

ये फुल विरासत मे
नही मिले है मुझे,
किसीने मेरा काँटो
भरा बिस्तर नही देखा !!.

■

# संकटांशी लढलो आणि शरद नगर धाडसाने उभं केलं

यश कुणालाही कधी सहज मिळत नाही. ध्येयाच्या वाटेवरुन चालताना अनेक प्रकारच्या काट्या - कुट्यांचा, नदी - नाल्यांचा आणि डोंगर -दऱ्यांचा सामना प्रत्येकालाच करावा लागतो. तेव्हा कुठे 'यशाचा दिवस' पाहायला मिळतो. मात्र त्या दिवसासाठी अनेक रात्रींचे 'दिवस' करावे लागतात. दिवस - रात्र मेहनत करावी लागते. प्रामाणिकपणा जपावा लागतो. परिश्रम, त्याग आणि समर्पण या त्रिसूत्रीवरच यशाचा दिवस पाहायला मिळतो. 'शरद नगर' उभारताना या सर्व बाबींचा अनुभव खूप जवळून घेतला. अनेक संकटांना सामोरे गेलो. आलेल्या सर्व बऱ्या - वाईट प्रसंगांना निर्धाराने तोंड

दिले आणि खचून न जाता प्रामाणिकपणा व मेहनतीच्या जोरावर अखेर स्वप्न पूर्ण केले.

आज जे छोटंसं का होईना पण 'शरद नगर' उभं राहिलयं, ते उभारणं एवढं सोपं किंवा सहज शक्य नव्हतं. पण सर्व प्रकारच्या संकटांवर मात करत ते शक्य करून दाखवले. खरं तर, पिक सारख्या छोट्याशा खेड्यातून वाडा शहरात आलो तेव्हा डोळ्यांत मोठी स्वप्ने साठवली होती. "गरीबीत जन्माला आलो असलो, तरी गरीबीतच मरायचं नाही आणि थोडसं का होईना पण नाव कमवायचं," असं मनाशी पक्कं ठरवलं होतं. शहरात येताना अंगावर एकच ड्रेस, दोन टोप व एक ताट एवढंच भांडवल होतं. या एवढ्याशा भांडवलावरच मोठी – मोठी स्वप्नं पाहिली. त्यापैकी एक स्वप्न होते, स्वतःच्या नावाचं नगर उभारणं. १९९० मधे पाहिलेलं हे स्वप्न २०२५ मधे पूर्ण केलं.

शहरात आल्यापासूनच डोक्यात नगर उभारण्याचं स्वप्न पिंगा घालत होतं. त्यासाठी आम्ही प्राथमिक तयारी केली होती. बांधकाम क्षेत्रातील ज्ञान मिळवणं सुरु होतं. मात्र प्रत्यक्षात काम केल्याशिवाय खरी माहिती मिळणार नव्हती, म्हणून मग अन्य व्यवसाय करता – करताच बिल्डरांच्या साइटवर जाणं सुरु केलं. खास अनुभवासाठी एका बिल्डरच्या साइटवर सुपरवायझर म्हणून वर्षभर काम केलं. पत्रकारितेत चांगलं नाव कमावलं होतं. 'शब्द मशाल' हे वृत्तपत्र तुफान चालत होतं. माझं धाडस आणि जिद्द पाहून एका श्रीमंत व्यापाऱ्याने मला त्याच्या कन्स्ट्रक्शन व्यवसायात भागीदार करुन घेतलं.त्याने पैसे लावायचे, मी साइटवर इतर सर्व कामं करणार. ही माझ्या दृष्टीने खूप मोठी संधी होती. एक पूर्ण इमारत कशी उभी राहते, याचं प्रात्यक्षिकच पाहायला मिळणार होतं. मी सुरुवात

केली आणि मागे वळून पाहिलेच नाही. नंतर २००० साली स्वत: चा कन्स्ट्रक्शन व्यवसाय सुरु केला.

छोट्या – मोठ्या इमारती बांधायला सुरुवात केली आणि त्याच वेळी स्वत: च्या नगराची संकल्पना डोळ्यासमोर ठेवून पहिली इमारत 'यशवंत नगर' मधे, तीही शहराच्या बाहेर एका शेतात बांधली. बांधकाम व्यवसायात नाव झालेलं असल्याने चांगला प्रतिसाद मिळाला आणि 'यशवंत नगर' ची पायाभरणी सुरळीतपणे पार पडली. आज हे नगरही मोठं झालं आहे. 'यशवंत नगर' मधे पहिली स्वत:ची छाप उठवणारी 'यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स' ही दिमाखदार इमारत अल्पावधीतच उभी राहिल्याने 'बिल्डर' म्हणून माझ्या नावावर शिक्कामोर्तब झालं आणि तेव्हाच शरद नगरच्या उभारणीचा संकल्प मनाशी पक्का केला.

'शरद नगर' उभारताना अनेक प्रकारच्या

वेगवेगळ्या कल्पना डोक्यात घोळत होत्या. त्या दृष्टीने एक स्वतंत्र ऐसपैस जागा हवी होती. ती जागा ऐनशेत रोडला मिळाली. ऐनशेत हे माझ्या मामांचं गाव असल्यामुळे तत्काळ होकार दिला आणि दि. २४ ऑगस्ट २००६ रोजी जमिनीचे रजिस्ट्रेशन झाले. वाडा शहरातील आगरी समाजाचे काशिनाथ चाहु पाटील यांची ती जागा. त्यांच्या मृत्यूनंतर अनेक खातेदार सातबाऱ्यावर चढलेले. त्यामुळे मोठ्या अडथळ्यांची शर्यत पार करत मदन काशिनाथ पाटील, अशोक काशिनाथ पाटील, नाना काशिनाथ पाटील, गोदावरी पांडुरंग गोतारणे, शांता कृष्णा पाटील व ठमा गोपाळ पाटील यांच्यासह अन्य खातेदारांनी सह्या करून जमीन माझ्या नावावर करून दिली. त्यावेळी त्या जागेवर काट्या - कुट्यांनी वेढलेले, झाडा - झुडपांनी भरलेले माळरान होतं. माझ्या व्यतिरीक्त कुणीही ती जागा घेण्याचा

विचारही केला नव्हता.

'शरद नगर' उभारण्याच्या वेडेपणामुळे मी मोठ्या धाडसाने निर्णय घेतला. पण २००६ पासून जमीन NA करुन हातात येईपर्यंत २०१० साल उजाडले. अनेक संकटं आली. सर्व संकटांवर मात करत दि. ८ मे २०१० रोजी शरद नगरच्या उभारणीस प्रत्यक्षात सुरुवात केली. मोठा गाजावाजा करत ऐनशेत रोडवरील 'वर्सीच्या माळाची' साफसफाई करुन त्या जागेवर 'बॅनर' लावण्याचा अर्थात प्रोजेक्ट लाँच करण्याचा मुहूर्त काढला. मात्र निमंत्रण देऊनही कुणी आलं नाही. माझी आई, पत्नी, दोन छोटी मुलं, आर्किटेक्ट महेश जाधव, सहकारी राम पाटील व बंड्या सुर्वे आणि ज्याला काम दिलं होतं तो किशोर जयसिंग नावाचा ठेकेदार व दोन कामगार यांच्या उपस्थितीत कुटूंबीयांसह बॅनर लावून प्रोजेक्ट लाँच केला. आईच्या व

मुलांच्या हस्ते नारळ फोडून मुहूर्त केला. एकूणच कार्यक्रमाचा फज्जा उडाला होता. "मोकळ्या माळरानावर, शहराच्या बाहेर नगर उभं राहूच शकत नाही, शरद पाटीलला वेड लागलयं," अशा प्रतिक्रीया व्यक्त होत होत्या. मी मात्र ठाम होतो. यश मिळेलच याची खात्री होती आणि " जाऊन - जाऊन आपलं काय जाणार? आपल्याकडे होतं तरी काय?" हाही विचार मनात होता, म्हणूनच खचून न जाता अगदी शून्यातून सुरुवात केली.

मोठ्या प्रयत्नांनी दि. २९ नोव्हेंबर २०१० रोजी वाडा ग्रामपंचायतीची पहिल्या इमारतीची परवानगी मिळवली. शिवसेनेचे त्यावेळचे प्रमुख नेते निलेश गंधे व सरपंच गिरीश कडू यांनी त्यासाठी सहकार्य केलं. शनिवार, दि. १ जानेवारी २०११ रोजी राजलक्ष्मी कॉम्प्लेक्स या पहिल्या इमारतीचे भूमिपूजन केले आणि शरद नगरच्या उभारणीस

प्रत्यक्षात सुरुवात झाली. स्वप्न पाहिले १९९० मधे आणि सुरुवात केली २०११ मधे. म्हणजे तब्बल २१ वर्ष लागली सुरुवात व्हायला. गरिबांची स्वप्नं पूर्ण व्हायला वेळ लागतोच. हा २१ वर्षांचा काळ खडतर होता. अत्यंत वाईट होता. खिशात कहीही नसताना गरिबांच्या नशिबामधे जे – जे येतं, ते सगळं भोगुन झालं होतं. लढून – भिडून – नडून इथपर्यंत पोहोचलो होतो. आता मागे फिरण्याचा प्रश्नच नव्हता. मग पुढे आणि पुढेच जात राहिलो . २०११ ते २०२५ हा १४ वर्षांचा काळावधी आठवला की आजही अंगावर शहारे येतात. १२ वर्षांची 'तपस्या' आणि २ वर्ष कोरोना कालावधीतला 'अज्ञातवास' असा तो काळ होता.

या १४ वर्षांत जे – जे अनुभवलं, ते भयानक व भयावह होतं. मात्र सुरुवातीला गमावण्यासारखं जवळ काहीच नव्हतं, त्यामुळे

‘ जाऊन - जाऊन आपलं काय जाणार,’ हाच मंत्र सतत घोकत होतो. आलेल्या संकटांना परतवून लावत होतो. शहरात आजपर्यंत कुणीही स्वतःच्या नावाचं नगर उभारलं नव्हतं, त्यामुळे जशी – जशी एक – एक इमारत उभी राहत होती, तशी – तशी जळणाऱ्यांची आणि नको ते बोलणाऱ्यांची संख्या वाढत होती. मोठ्या प्रमाणावर तक्रारी केल्या जात होत्या. चौकशा होत होत्या. हे सुरुवातीलाच माहित होतं, म्हणून पायाभरणी करतानाच ‘खोटं व चुकीचं’ काहीही करायचं नाही, असं ठरवलं होतं. त्यामुळे चौकशांत काहीही निष्पन्न होत नव्हतं. पै-पैशाचा हिशोब ठेवत होतो. टॅक्स प्रामाणिकपणे भरत होतो. नियमात जे असेल तेच करत होतो. तरीही त्रास देणं सुरुच होतं, मात्र सर्वांना पुरुन उरलो. कुठेही सापडलो नाही.

आत्तापर्यंत वाडा शहराच्या इतिहासात

कुठल्याच बिल्डरची कागदपत्रं माहितीच्या अधिकारात जेवढ्या वेळा मागितली नसतील, तेवढया वेळा 'शरद नगर' ची कागदपत्रं ग्रामपंचायतीकडून व नंतर नगरपंचायतीकडून मागीतली गेली. विशेष म्हणजे, इतर बिल्डरांची कागदपत्रं द्यायला अधिकारी टाळाटाळ करतात, पण शरद नगरची कागदपत्रं अर्ज दाखल केल्या-केल्याच दिली जातात. कुणीतरी काहीतरी चुकीचं शोधेल अशी भाबडी आशा अधिकाऱ्यांना असते. आता तर सर्व काही ऑनलाईन झाल्याने व रेरा कायदा आल्याने खऱ्या बिल्डरांना कुठलीच भीती उरलेली नाही. माझ्यासारख्या बिल्डरांना तर भीती वाटायचा प्रश्नच येत नाही. सुरुवातीला मात्र खूप त्रास झाला. विनाकारण त्रास देण्याचाही प्रयत्न झाला. अनेक संकटं आली. सर्व संकटांना अंगा - खांद्यावर खेळवलं आणि शरद नगर उभं केलं.

बिल्डर आणि पत्रकारिता हे दोन्ही वेगळे विषय. मी मात्र दोन्ही भूमिका एकाच वेळी निभावत असल्याने आणि सातत्याने बेधडक - बिनधास्तपणे लिखाण करत असल्याने शत्रूंची संख्या झपाट्याने वाढत होती. पत्रकारितेमुळे अनेकांशी शत्रुत्व पत्कारले होते. हे शत्रू, जळणारी लोकं आणि प्रतिस्पर्धी व्यावसायिक हे व्यक्तीशः माझ्या विरोधात काहीही करता येत नसल्याने 'शरद नगर' वरच सर्वजण घसरत होते. गेल्या १४ वर्षात शरद नगरच्या व माझ्या एवढ्या वेळा चौकशा झाल्यात की, आता त्या तक्रारींचं आणि चौकशांचं काहीही वाटेनासं झालं आहे. उलट कुणी तक्रार केली नाही, तर चुकल्यासारखं वाटते.

व्यवसायात आपले जेवढे शत्रू जास्त तेवढे आपण सावध असतो. चुकीचं काही करण्याचा विचारही आपल्या मनात येत नाही. विरोधक

छोटीशी का होईना, पण चूक शोधतच असतात. त्यामुळे पावला - पावलांवर आपण सावध राहतो. म्हणूनच व्यवसायात एक तर शत्रू करु नयेत आणि केले तर चुका करु नयेत. मी पत्रकार असल्याने रोज नवनवीन शत्रू निर्माण करत होतो, मात्र त्याच वेळी खूपच सावध राहून व्यवसायही करत होतो. तरीही अनेकांनी घेरण्याचा प्रयत्न केला, पण यश कुणालाच आले नाही.

शरद नगरची सर्वात मोठी कसोटी ही नगरपंचायत झाल्यानंतरची होती. वाडा नगरपंचायतीत नवे मुख्याधिकारी नियुक्त झाले होते. त्यांनी शहरातील बिल्डरांना त्रास देऊन पैसे उकळणे सुरु केले होते. शहरातील नगरसेवकांची त्यांना साथ होती. शहरातील अनाधिकृत बांधकाम धारकांना धमकावून वसुली जोरात सुरु होती. मी पत्रकार होतोच, पण बिल्डरही होतो आणि शहरातील

बिल्डरांचे नेतृत्वही करत होतो. त्यामुळे या वसुली विरुद्ध २०१९ मधे खुला आवाज उठवला. 'मशाल' चॅनलमधून वाभाडे काढले. नगरपंचायती विरुद्ध लढण्याची हिंमत कोणताही बिल्डर दाखवू शकत नव्हता. मी मात्र लढत होतो. 'त्या' मुख्याधिकाऱ्यांनी शहरातील ६५ बांधकाम इमारतींना अनाधिकृत ठरवून नोटीसा दिल्या होत्या. मात्र शरद नगर मधील एकाही इमारतीला नोटीस देता आली नव्हती. त्यामुळे सर्वांच्याच नजरा शरद नगरकडे होत्या. मुख्याधिकारीही विरोधात गेले होते. त्यांनी शरद नगरची सर्व कागदपत्रे दहा – दहा वेळा तपासली, मात्र कुठेही काही सापडले नाही. शेवटी मुख्याधिकाऱ्यांनी शरद नगरमध्ये येऊन दिलेल्या परवाणगीनुसार इमारती बांधल्या आहेत का ? याची तपासणी केली. सर्व नियम पाळलेले आहेत, बांधकाम नियमानुसारच आहे, हे पाहून हतबल

झालेल्या मुख्याधिकाऱ्यांनी हात टेकले. त्यावेळी जर इतर बिल्डरांप्रमाणे कुठल्यातरी चुकीत सापडलो असतो, तर माझ्याविरुद्ध सर्वपक्षीय नगरसेवक एक झाले असते, आधीच विरोधात असलेल्या मुख्याधिकाऱ्यांनी इमारती तोडायलाच लावल्या असत्या. मात्र कुठलीच चूक नसल्याने मुख्याधिकाऱ्यांविरुद्ध लढलो आणि जिंकलोही.

व्यवसाय सुरु करताच काही नियम स्वतःसाठी लावून घेतले होते. "एकही चूक करायची नाही आणि शासनाच्या सर्व नियमांचे पालन करायचे," हे ठरवून व्यवसाय सुरु केला होता. त्यामुळे कितीही तक्रारी झाल्या तरी कुठेही सापडलो नाही. मात्र कोरोनाने मोठा दणका दिला. कोरोनाचे महाकाय संकट सर्वच व्यवसायांवर घोंघावत होते. सर्वच काम - धंदे बंद झाले होते. 'शरद नगर' ही त्याला अपवाद नव्हते. नाईलाजाने काम बंद

करताना डोळे भरुन आले. कुठलीही चूक नसताना शरद नगर मधील सहाव्या इमारतीचे काम बंद पडले होते. या कोरोनाच्या तडाख्यात बरेच व्यवसायिक कायमचे झोपले. अनेकांचे धंदे बंद झाले. ते खूपच मोठे संकट होते. मात्र अनुभव व मेहनतीच्या जोरावर पुन्हा उभा राहिलो. ग्राहकांचा कमावलेला विश्वास कामाला आला आणि कोरोना संपताच पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागलो.

गेल्या १४ वर्षात शरद नगर उभारताना अनेक संकटं आली. नको त्या आणि नको तेवढ्या चौकशा झाल्या या सर्व संकटांमधून तावून - सुलाखून निघालो होतो. त्यामुळे 'कोरोना' सारखं संकटही लीलया पेलले. आता 'कोरोना' पेक्षा मोठे संकट येणे अशक्यच. त्यामुळे शरद नगरची वाटचाल यापुढेही सर्व संकटांच्या छाताडावर उभे राहून यशस्वपणे सुरुच राहील. ■

# ‘ब्लॅकमनी’ न स्विकारताही ‘शरद नगर’ उभं राहिलं

व्यवसाय मग तो कुठलाही असो, तो सुरु करताना त्या व्यवसायाची पूर्ण माहिती आधीच करुन घ्यायची असते. स्वतः त्या व्यवसायामधे काही दिवस काम करुन अनुभव घ्यायचा असतो. त्या व्यवसायातील सर्व काही माहिती मिळवल्यानंतर, सगळ्या खाचा - खोचा अनुभवल्यानंतर तो छोट्या प्रमाणात सुरु करायचा आणि हळु - हळु वाढवत न्यायचा, हे माझ्या व्यवसायीकतेचे सुत्रं आहे. ‘एसपी फॉर्मुला’ म्हणून मी तो अनेक भाषणांतुन व लेखांतुन मांडला आहे. मी ही स्वतः याच माझ्या फॉर्मुल्याचा वापर कुठलाही नवा व्यवसाय सुरु करताना करतो. त्यामुळेच माझा एकही व्यवसाय आत्तापर्यंत तोट्यामधे गेलेला

नाही.

'शरद नगर' उभारणीस सुरवात करतानाही हाच फॉर्मुला वापरला. 'यशवंत नगर' उभारणीचा अनुभव गाठीशी होताच. तरीही इतर बिल्डरांप्रमाणे हा व्यवसाय न करता वेगळ्या पद्धतीने, इतरांपेक्षा वेगळं काही करता येईल का ? या दृष्टीने विचार सुरु केला. त्यावेळी लक्षात आले की, बांधकाम व्यवसायामधे ब्लॅकमनीचा वापर खुप मोठ्या प्रमाणावर होतोय. या व्यवसायाचा मुख्य पायाच व अर्थिक स्त्रोत काळा पैसाच आहे. त्यामुळे चुकीच्या अनेक गोष्टी सातत्याने घडतात. ६०.४० चा फॉर्मुला जणूकाही सर्वमान्यच आहे. याचा सर्वाधिक फटका हा ग्राहकाला बसतो. ४० टक्के रकमेचा हिशोब कुठेही लागत नाही. कर्ज काढून वा कष्टाच्या पैशाने घर घेणारे फसतात. रजिस्टरही कमी किंमतीचेच होते. त्याचे अनेक तोटे भविष्यात ग्राहकाला सहन

करावे लागतात. ही शुद्ध फसवणूक आहे. आत्तापर्यंतच्या व्यवसायांमधे माझ्याकडून कुणाचीही फसवणूक झालेली नाही. कुठल्याही पोलीस ठाण्यामधे साधी एनसीही कुठल्या ग्राहकाने नोंदवलेली नाही की कुठल्याही ग्राहकाला न्याय मागण्यासाठी न्यायालयामधे धाव घ्यावी लागलेली नाही. एकाही ग्राहकाची फसवणूक होऊ नये व शांत झोप लागावी यासाठी ‘ब्लॅकमनी’ न स्विकारताच फ्लॅट विकायचे, ब्लॅकमनीचा शिरकाव ‘शरद नगर’ मधे होऊच द्यायचा नाही, असे ठरवून जाहिरात करायला सुरुवात केली. ‘आम्ही ब्लॅकमनी स्विकारत नाही’ असे ठळक अक्षरामधे लिहिलेले बॅनर जागोजागी झळकले आणि चर्चेला उधाण आले. उलट – सुलट चर्चा सुरु झाल्या. त्यावेळी बांधकाम व्यवसायामधे ६०:४० चा फॉर्मुला तेजीत होता. सर्वमान्यही होता. देशभरातील बांधकाम

व्यवसायामध्ये हा फॉर्मुला आजही वापरला जातोय.

फ्लॅट घेणाऱ्या ग्राहकाने बिल्डरला एकूण रकमेपैकी ६० टक्के रक्कम 'व्हाईट' मध्ये म्हणजे चेक स्वरुपात द्यायची आणि ४० टक्के रक्कम 'ब्लॅक' मध्ये म्हणजेच रोख स्वरुपात द्यायची. सर्वच बिल्डर असे करतात. ते एक नागडे सत्य आहे. विशेष म्हणजे ग्राहकांचाही या 'ब्लॅक – व्हाईट' पद्धतीला विरोध नाही. देशभरातील बांधकाम व्यवसायामध्ये फ्लॅट विक्रीचा व्यवसाय असाच चालतो, यावर सर्वांचाच विश्वास आहे. कारण बिल्डरांनी जर का ' ब्लॅकमनी ' घेतला नाही तर ते हा व्यवसाय करुच शकत नाही, अशी या व्यवसायाची परीस्थीती आहे. बिल्डरला प्रत्येक ठिकाणी पैसे मोजावे लागतात. लाच द्यावीच लागते. या व्यवसायातील भ्रष्टाचाराला राजमान्यताच मिळाली आहे की काय ? अशी शंका येण्यापर्यंत व्यवहार राजरोस होतात. सर्व शासकीय

अधिकारी जणू काही शासनाचा नियम आहे अशा पद्धतीने स्क्वेअर फुटाचा दर लावून पैसे घेतात. शिपायापासुन ते थेट वरीष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचेच दर हे रेटकार्डप्रमाणे ठरलेले. ते दिले नाहीत तर फाईल मंजुरच होत नाही. फाईल मंजुर करण्यासाठी दलालांचे रॅकेटही राजरोस कार्यरत. नगरविकास विभागामधे चालणारा भ्रष्टाचार हा खुल्लम - खुल्ला चालतो. सर्वांना सर्वकाही माहित असते आणि सर्वांचाच त्यामधे वाटा असतो.

**शासकीय कार्यालयातील 'देणी' दिल्यानंतरही बिल्डरांना पिडणारे अनेक महाभाग तयारच असतात. बिल्डरकडे प्रचंड 'ब्लॅकमनी' असतो आणि त्यावर आपलाच अधिकार आहे, आपल्यालाही त्यातील 'हिस्सा' मिळायलाच पाहिजे, असा हक्क सांगणारेही अनेक असतात. त्यामधे राजकारण्यांचा पहिला क्रमांक लागतो.**

त्यानंतर गुंडांचा अर्थात दादा - भाईंचा. त्यांना तर सांभाळावेच लागते. नाहितर साईट सुरुच होत नाही. जो पर्यंत बिल्डरांचे काम सुरु आहे तोपर्यंत येणारे सर्व सण - उत्सव सांभाळावे लागतात. मंडळांचे पदाधिकारी पावती बुक घेऊन तयारच असतात. इतरही सार्वजनिक कार्यक्रमांना देणग्या द्याव्याच लागतात. सर्वजण बिल्डरकडे मोठ्या 'आशेने' बघतात. बिल्डरला कुणालाही नाराज करुन परवडणारे नसते. माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करुन त्रास देणाऱ्यांची तर फौजच असते. त्यांना सांभाळावे लागते, पोसावे लागते. इतरही बऱ्याच गोष्टींसाठी पैसा खर्च होतो. त्यामुळे प्रत्यक्षात इमारत बांधकामाच्या आधीच बरीचशी रक्कम ही रोख स्वरुपात खर्च झालेली असते. हे सर्व व्यवहार रोखीने होतात. त्यासाठीच 'ब्लॅकमनी' वापरला जातो. बांधकाम व्यवसायामधे घेण्या - देण्यासाठी

ब्लॅकमनीचा राजरोस व सर्रास वापर होतो. म्हणूनच बिल्डर ४० टक्के 'ब्लॅकमनी' घेतात, याचा अभ्यास आमचा आधीच झालेला होता. तरीही 'ब्लॅकमनी' घ्यायचाही नाही किंवा द्यायचाही नाही', हे ठरवूनच 'शरद नगर' उभारणीस प्रारंभ केला.

'आम्ही ब्लॅकमनी स्विकारत नाही', हा ठळक अक्षरामधे शरद नगरच्या जाहिरात फलकांवर लिहिलेला मजकुर वाचुन अनेकांनी सल्ला दिला की, ''हा व्यवसाय मुळातच : ब्लॅकमनीवर आधारीत आहे. फ्लॅटच्या किंमती लाखोंच्या घरात असतात. ते घेणं हे ब्लॅकमनी ज्यांच्याकडे आहे, त्यांनाच परवडते. तेच फ्लॅट घेतात. 'व्हाईट' मधे पैसे कमावणारे फ्लॅट घेऊच शकत नाही. ब्लॅकमनीवाले प्रकल्प सुरु होण्याआधीच प्रकल्पांमधे गुंतवणूक करतात. त्याचा फायदा बिल्डरांना होतो. तुझ्या या अशा जाहिरातींमुळे कुणीही दोन नंबरवाला येणार

नाही. त्यातच तु पत्रकार. त्यामुळे कुणीही पैसे गुंतवणार नाही. तुझे शरद नगर उभारण्याचे स्वप्न स्वप्नच राहील. म्हणून तडजोडीची तयारी ठेव. पैसा हा पैसा असतो तो 'ब्लॅक वा व्हाईट' नसतो. बांधकाम व्यवसाय ज्या पद्धतीने केला जातो त्याच पद्धतीने कर. नाहितर फसशील" अनेकांनी अनेक प्रकारचे सल्ले दिले. मात्र कुठल्याही व्यवसायाची सुरुवात करताना, आपण स्वत:वर काही बंधन घातली पाहिजेत. स्वत:साठी का होईना पण नियम बनवले पाहिजेत. ठरवलेली तत्व पाळली पाहिजेत आणि धोरणं ठरवूनच त्याप्रमाणे व्यवसाय केला पाहिजे, नाहितर अपयश येतं. हे मी माझ्या अनेक छोट्या - मोठ्या व्यवसायातुन अनुभवलं होतं. त्यामुळे मी बदलायला तयार नव्हतो. यश नक्की मिळेल, यावर माझा विश्वास होता.

खरं तर, कोणताही व्यवसाय इतरांपेक्षा

वेगळेपणानं केला, तरच लोकं आकर्षित होतात. बांधकाम व्यवसायामधे ‘ब्लॅकमनी’ घेतल्याशिवाय व्यवसाय करुच शकत नाही, ही समजुत खोडून काढायची होती. आणि ते फक्त मीच करु शकतो, यावर माझा ठाम विश्वास होता, कारण मी पत्रकार होतो. तोही बऱ्यापैकी नावाजलेला. त्यामुळे माझ्याकडून कुठलाही अधिकारी वा कर्मचारी लाच मागु शकत नव्हता. कुठलाही दादा - भाई माझ्याकडून खंडणी उकळू शकत नव्हता की राजकारणी ब्लॅकमेल करु शकत नव्हते. ‘ एक्स्ट्रा मनी ’ खर्च होण्याचा प्रश्नच येत नव्हता. त्यातच मला कुठलेही छंद, नाद नव्हते. पैशाचा फार काही हव्यास नव्हता. मी जमिनीवरचा बिल्डर होतो. माझे खर्च मर्यादित होते. कुठलेही शान – शौक नव्हते. प्रचंड गरीबीतून आल्याने गरजाही खुप मर्यादित होत्या. दिखाऊपणा करण्याची मला गरज वाटत

नव्हती. इतर बिल्डरांचा जो फालतु खर्च होतो, तो माझ्याकडून होण्याचा प्रश्नच येत नव्हता.

कुठलेही काम प्रामाणिकपणे आणि नियमाने करण्याचा माझा स्वभाव आहे. खोटं केलं की ते निस्तरण्यासाठी वेळ व पैसा जातो, त्यापेक्षा नियमातच राहिलेलं बरं. खोटेपणाने कमावलेला पैसा हा खोट्याला झाकण्यासाठीच खर्च होतो. खरे काम करणाऱ्याला चुकीच्या पद्धतीने पैसे द्यावे लागत नाहीत. म्हणूनच मी चुकीचे वा नियमबाह्य काम करुन स्वतःला त्रास करुन घेत नाही. 'शरद नगर' ला सुरुवात करण्याआधीही मी बांधकाम व्यवसायामध्ये होतो. मात्र कधी नया पैसा कुणाला लाच म्हणून दिली नाही. कुणी मागितलीही नाही. 'टाऊन प्लँनीग' अर्थात TP नावाचा महाकाय राक्षस प्रत्येक स्क्वेअर फुटाला पैसे घेतो. तरच फाईल क्लीअर करतो. माझी फाईल मात्र एकही

नया पैसा न देता क्लीयर होते. पैसे मिळणार नसल्याने अधिकारी सर्व नियमांचे पालन करुन घेतात. एकही चुक शिल्लक ठेवत नाहीत. सर्व कागदपत्रांची व नियमांची पूर्तता करुनच परवानगी दिली जाते. एकही चूक स्वीकारली जात नाही. त्याचा भविष्यात मला फायदा होतो. कुणी कितीही तक्रारी केल्या, तरीही काही फरक पडत नाही. लाच न दिल्याचा हाही मोठा फायदा असतो.

अधिकाऱ्यांना लाच देऊन त्यांच्याकडून खोटं वा चुकीचं काम करुन घेतलं की ते भूत कायमचं मानगुटीवर बसते. कधी ना कधी ते बाहेर येतं. आणि मग पुन्हा लाच देऊनच ते मिटवावं लागतं. कधीही चुकीचं वा खोटं काम करुन घेणं फायद्याच नसतं. त्यापेक्षा खरं काम करुनच पुढे जाणं गरजेचं असतं. आज २०२५ मधे माझ्या व्यवसायाला २५ वर्ष पूर्ण होताहेत. मी अभिमानाने

सांगतो की या २५ वर्षाच्या बांधकाम व्यवसायामधे मी कुणालाही लाच दिलेली नाही की 'ब्लॅकमनी' कधीही स्वीकारलेला नाही. 'शरद नगर' च्या सुरुवातीपासुन आजपर्यंत मी जेवढे फ्लॅट विकले आहेत किंवा त्याआधीही जेवढे फ्लॅट विकले होते, त्यापैकी एकही फ्लॅटधारक सांगु शकणार नाही की, शरद पाटील यांनी आमच्याकडून ब्लॅकने पैसे घेतलेत. ६०:४० फॉर्मुला आम्ही केव्हाच मोडीत काढला आहे. सर्वच ग्राहकांशी पारदर्शकरित्या व्यवहार केला आहे. चेक द्वारेच पैसे स्वकारले आहेत.

या पारदर्शक व 'व्हाईट मनी' स्विकारण्याचा फायदा असा झाला की, सर्वसामान्य व ' व्हाईट मनी ' धारकांचा आमच्यावर विश्वास बसला. आमच्याकडे दोन नंबरवाले किंवा ब्लॅकमनीवाले कुणीही आले नाहीत. मात्र जे सरकारी कर्मचारी होते, जे १० टक्के रक्कम भरुन उरलेल्या

रकमेचे कर्ज घेऊन फ्लॅट घेणारे होते, त्यांची संख्या वाढली. खऱ्या आणि चांगल्या लोकांचा ओढा शरद नगरकडे सुरु झाला. सर्वच बँकानी चांगली साथ दिली. कुठल्याही बँकेत गेलं आणि शरद नगरचं नाव सांगितलं की कर्ज मंजुर होतं.

'आम्ही ब्लॅकमनी स्विकारत नाही'. या जाहिरात पत्रकावरील वाक्यानेच 'ब्लॅकमनी' वाले बाद झाले आणि 'व्हाईटमनी' वाले शरद नगर मधे आले. समाजामधे फ्लॅट घेणारी दोन प्रकारची लोकं राहतात. एक श्रीमंत वर्ग व दुसरा मध्यम वर्ग. हा मध्यमवर्गीय आमच्या नजरेसमोर होता. आम्ही त्या दृष्टीने त्यांना हवा असलेला पारदर्शकरित्या व्यवहार सुरु केला होता. तो त्यांच्या मनाला भावला. त्यांनाही अभिप्रेत असलेला 'व्हाईट मनी' चा पारदर्शकरित्या व्यवहार करणारा बिल्डर पर्याय म्हणून आमच्या रुपाने मिळाला. जे कुठलाच

बिल्डर करत नव्हता ते करण्याचं धाडस आम्ही केलं आणि ते यशस्वी झालं.

या ' व्हाईट मनी ' च्या व्यवहाराचा फायदा आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्लॅकमनीवर घातलेल्या निर्बंधानंतर आणि रेरा कायदा लागू झाल्यानंतर मोठ्या प्रमाणावर झाला. आर्थिक मंदीचे सावट या बांधकाम व्यवसायावर घोंघावत असतानाही आम्हाला काहीही फरक पडला नाही तो यामुळेच. नरेंद्र मोदींनी ब्लॅकमनी धारकांना चांगला चाप लावला होता. कुणीही ब्लॅकमनी बाहेर काढत नव्हते. सर्वजण चौकशांना घाबरुन होते. त्यामुळे बांधकाम व्यवसाय जवळपास ठप्प झाला होता. अगदी त्यावेळीही आम्हाला तसुभरही फरक पडला नव्हता. कारण ब्लॅकमनीवाले आमच्याकडे येतच नव्हते. रेरा कायदा आल्यानंतर अनेक बिल्डर या व्यवसायातुन बाद झाले. मोदींच्या ब्लॅकमनी

विरुद्ध धोरणामुळे अनेक बिल्डर अडचणीत आले त्यांना मोठा भुर्दंड सोसावा लागला. आमचे मात्र नया पैशांचेही नुकसान झाले नाही. उलट फायदाच झाला. आम्ही सुरुवातीपासून 'पारदर्शक व्यवहार' व 'व्हाईट मनी' या दोन तत्वांवर ठाम राहिलो आणि शरद नगर मधे 'ब्लॅक मनीचा' शिरकाव होऊ दिला नाही. 'ब्लॅकमनी' न घेताही बांधकाम व्यवसाय यशस्वी होऊ शकतो, याचे शरद नगर हे उत्तम उदाहरण आहे. म्हणूनच, "मी आज पर्यंत कुणालाही कुठल्याही कामासाठी वा परवानगीसाठी एक नया पैसाही दिलेला नाही की, कुठल्याही फ्लॅट धारकाकडून नया पैसाही ब्लॅकने घेतलेला नाही," हे मी मोठ्या अभिमानाने सांगु शकतो. ■

# शरद नगरचा स्वप्नपूर्ती बाप्पा

'Dream it, Believe it, do it,' या शब्दांनी माझं आयुष्य पुरतचं बदलुन गेलयं. 'स्वप्न बघा, त्यावर विश्वास ठेवा आणि ती प्रत्यक्ष कृतीमधे आणा' असा त्याचा अर्थ. माझा या शब्दांवर खूप विश्वास आहे. मी खुप स्वप्न पाहातो. पण ती जागेपणी. डोळे उघडे ठेऊन. मी पाहिलेल्या प्रत्येक स्वप्नांवर अंतःकरणापासून प्रेम करतो. स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतो. मोठ्या जिद्दीने आणि परीश्रमाने यश खेचून आणतो. म्हणूनच माझा जागेपणी पाहिलेल्या स्वप्नावर प्रचंड विश्वास आहे.

मी अत्यंत गरीबीच्या परिस्थितीमधून आलोय. भयावह अशी गरीबी मी अनुभवलीय.

पडेल ती कामे केलीत. त्यातच जन्माला येतानाच मी कुरुप म्हणून जन्माला आलो होतो. मला निटसा चेहराच नव्हता. ओठ फाटलेले, दात पुढे आलेले, वेडेवाकडे. खुपच विचित्र चेहरा दिसायचा. त्यातच घरात प्रचंड गरीबी. सर्वार्थाने प्रतिकुल परिस्थिती होती. त्यामुळे गरीबांची पोरं जशी पडत - उठत वाढतात, पुढे येतात तसाच मी ही आल्याने, गरीबांच्या पोरांनी पाहिलेल्या स्वप्नांची जशी माती होते, तशीच ती माझ्या शेकडो स्वप्नांची झालीय. अनेकदा अपयश आलेय. संकटं तर एवढी आलीत की, त्यांची आठवण काढली तरी अंगावर काटा उभा राहतो.

मात्र कितीही संकट आली तरी मी स्वप्न पाहाणं काही सोडलं नाही. स्वप्नांची पुर्तता करताना साध्या –साध्या गोष्टींसाठी खुप मोठा संघर्ष करावा लागला. रोजच्या उगवत्या सुर्याबरोबर रोज नवे

संकट हात जोडून पुढे उभे राहायचे. मग त्या संकटावर स्वार होऊनच पुढे जावे लागायचे. प्रत्येक पावलागणिक संकटांची चाहुल लागायची. पण स्वप्नांवर विश्वास होता. त्यामुळे जिद्द सोडली नाही. घाबरायचा तर प्रश्नच नव्हता.

कोणत्याही परिस्थितीमधे स्वप्न पूर्ण करायची होती. त्यासाठी कुठलीही किंमत मोजायची तयारी होतीच. स्वप्नांवर श्रद्धा होती. म्हणूनच एक स्वप्न भंगलं की दुसरं पाहायचो. दहा पैकी एखाद्या स्वप्नांमधे यश यायचे. कळायला लागल्यापासूनच या स्वप्नमय जगातच वावरत आलोय. त्यामुळे स्वप्न पाहायची एक सवयच जडली. या सवयीतुनच एक भलंमोठं स्वप्न पाहिलं. स्वतःच्या नावाचं, स्वतःचं एक सर्वांगसुंदर व सर्व सोयींनी सुसज्ज असलेलं माझ्या स्वप्नातलं नगर उभारायचं.

माझ्या पुर्ण खानदानामधे कुणी पत्रकार

नव्हतं. मात्र मी स्वप्न पाहिलं एक यशस्वी पत्रकार व्हायचं. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीमधे मी ते पूर्ण केलं. सलग ३७ वर्षे मी पत्रकारिता करतोय. महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांतून मी लिखाण केलयं. आजही करतोय.

नुसतं पत्रकार होऊन माझं मन रमत नव्हतं. मला माझं स्वतःचं वृत्तपत्र काढायचं होतं. तेही वाड्यासारख्या ग्रामीण भागातून. १९९४ मधे वाडा शहरातील पेपर स्टॉलवर फक्त २० पेपर यायचे. त्यापैकी नवाकाळ, लोकसत्ता, मुंबई सकाळ व सामना हेच चार पेपर कसेबसे संपायचे. तेही शासकीय अधिकारीच विकत घ्यायचे. अशा परिस्थितीमधे एक स्वतंत्र वृत्तपत्र काढायचं स्वप्न पाहिलं आणि वयाच्या २३ व्या वर्षी ' शब्द मशाल ' नावाचं वृत्तपत्र सुरु केलं.

आज या वृत्तपत्राला ३१ वर्ष पूर्ण

झालीत. या वृत्तपत्राच्या जोडीला ‘ शब्द संग्राम ’ हे वृत्तपत्रही सुरु केलं. ही दोन्ही वृत्तपत्र प्रचंड खपाची व वाचकांच्या आवडीची वृत्तपत्र म्हणून ओळखली जातात. अनेक संकटांवर मात करुन ती दोन्ही वृत्तपत्र सुरु आहेत. चांगल्या संपादकांमधे माझी गणना होते, हे विशेष.

पत्रकार झालो, संपादक झालो. मग लेखक व्हायचं ठरवलं. कुठलीही पार्श्वभुमी नसताना केवळ वाचन व अभ्यास करुन मी लेखक झालो. आजच्या घडीला सर्वाधिक लिखाण करणारा लेखक म्हणून माझे नाव आहे. अनेक मान्यवरांच्या हस्ते माझ्या पुस्तकांची प्रकाशने झालीत. एक वेगळा वाचक वर्ग राज्यभर निर्माण करण्यात यश मिळवलय आणि विविध विषयांवर मी अनेक पुस्तके प्रकाशित केलीत.

अशी न जमणारी अनेक स्वप्न मी पाहिली

आणि जिद्दीने ती पुर्णही केली. मी पाहिलेल्या आणि पूर्ण केलेल्या स्वप्नांची यादी खुप मोठी आहे. त्यापैकीच एक स्वप्न म्हणजे बिल्डर बनण्याचे.

मी कला शाखेचा पदवीधर आहे. माझ्याकडे बिल्डर बनण्यासाठीचे कुठलेही ज्ञान नव्हते. मात्र इतर स्वप्नांबरोबरच बिल्डर बनण्याचे स्वप्न मनामध्ये पिंगा घालु लागले. मी त्याच कल्पनांमध्ये रमु लागलो. इतर बिल्डरांच्या साईटवर जाऊन अनुभव घेऊ लागलो. मी वाडा शहरातीलच आर्किटेक महेश जाधव यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांच्याकडून पुर्ण माहिती घेतली. मग स्वप्न पूर्ण करण्याच्या तयारीला लागलो. शहरातील ‘ यशवंत नगर ’ मधे मी ‘ यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स ’ नावाची बिल्डींग बांधायला घेतली.

जवळ फारच थोडे पैसे होते. मात्र स्टेट बँकेचे मॅनेजर श्री. विद्यासागर प्रसाद यांनी साथ

दिली. त्यांनी बिल्डरला बिल्डींग बांधायला बँक कर्ज देता येत नाही म्हणून वेगळ्या मार्गाने मदत करुन मला १० लाखांचे कर्ज दिलं. त्या पैशांवरच ' यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स ' ची पायाभरणी केली. आज परळी नाका येथे यशवंत नगर आकाराला येत आहे, तेथे मी जेव्हा बिल्डींग बांधायला घेतली तेव्हा एकही इमारत नव्हती. शहरापासून एवढ्या लांबवर बिल्डींग बांधून फ्लॅटची विक्री करणे, हे सर्वांनाच अशक्य वाटत होतं. मात्र अशक्य गोष्टही मी जिद्दीच्या परिश्रमांच्या जोरावर शक्य करुन दाखवली. आणि जेथे एकही बिल्डींग नव्हती तेथे आज ओळीने बिल्डींग उभ्या राहात आहेत.

' यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स ' ची निर्मिती करताना खुप अनुभव आले. दिवस - रात्र फक्त याच इमारतीचा ध्यास घेतला होता. झपाटल्यागत काम करत होतो. अनेक अडचणी आल्या. पहिली

गोष्ट म्हणजे, ' मी बिल्डींग पूर्ण करेन की नाही ' हीच शंका अनेकांच्या मनामध्ये होती. त्यामुळे फ्लॅटची बुकींग होत नव्हती. मात्र दोन वर्षाच्या आत मी इमारत बांधुन पूर्ण केली. त्यामुळे लोकांचा विश्वास बसला आणि फ्लॅट विकले गेले. घेतलेले कर्ज पूर्णतः फेडले. मात्र दोन वर्षामध्ये जे अनुभव आले ते पाहाता दुसरी नवीन बिल्डींग बांधावी की नाही, असा प्रश्न पडला होता.

बांधकाम व्यवसाय हा माझ्या दृष्टीने खुपच नवा होता. त्यामुळे थकलो होतो. मात्र व्यवसाय आवडला होता. एका सुंदर इमारतीची निर्मिती माझ्या हातुन झाली होती. ही इमारत कायम स्वरुपी राहणार होती. आपल्या मृत्यूनंतर मागे काय उरतं ? ते छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवुन दिलेय. त्यामुळे स्फुरण चढले. हार मानायची नाही, असे ठरवले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा मी अभ्यासक आहे. लहाणपणीच त्यांचा इतिहास अनेकदा वाचलाय. बिल्डर बनताना या अभ्यासाचा खुप फायदा झाला. छत्रपतींची कारकिर्द सुमारे चारशे वर्षांपुर्वीची. त्यावेळी कसलेही तंत्रज्ञान नव्हते. यंत्रणा नव्हती. वाहतुकीची व्यवस्था चांगली नव्हती.

त्यावेळच्या आणि आजच्या परिस्थितीमध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. मी तंत्रज्ञान हातात घेऊन फिरतोय. कॉम्प्युटरच्या जमान्यामध्ये वावरतोय. वातानुकुलीत कार्यालयामध्ये बसुन सर्वकाही हाताळु शकतो. तरीही मी एक बिल्डींग बांधुन थकलोय. छत्रपतींनी त्याकाळामध्ये ३०० हुन अधिक किल्ले बांधले. तेही उंच डोंगरावर, पाण्यात, जंगलात, जिथे कुणीही पोहचू शकत नाही तिथे महाराजांनी गड – किल्ले बांधले आणि मला

सगळ्या सुविधा असताना, सर्व यंत्रणा हातामधे असतानाही मी एका पेक्षा जास्त इमारती चांगल्या सपाट जागेवर बांधु शकत नाही. मग छत्रपतींचे नाव तरी कशाला घ्यायचे ?

मनामधे विचारांचा गोंधळ सुरु झाला. पाच दिवस विचार करत तळमळत काढले. शेवटी निश्चय केला. महाराजांनी स्वराज्यासाठी शेकडो गड - किल्ले त्याकाळात बांधले आपण स्वत:साठी किमान ३०० फ्लॅट तरी बांधु. या विचाराने सर्व प्लॅनिंग सुरु केले आणि ते करत असतानाच ‘ या शहरामधे एक स्वत:चे नगर उभे करायचे,’ असे स्वप्न पाहून कामाला लागलो. समोर असंख्य अडचणी होत्या. पैशांची चणचण होती. इतरही अनेक बाबी होत्या. त्यामुळे हिम्मत होत नव्हती.

वर्ष तसेच गेले. काय करायचे हा मोठा प्रश्न होता. जमेल का ? असे वारंवार वाटत होते.

रोज फक्त स्वप्नचं रंगवत होतो. अखेर निर्धार केला आणि माझ्या लाडक्या गणपती बाप्पा समोर उभा राहिलो. डोळे मिटले. शांतपणे बाप्पाचे स्मरण केले. विनम्रपणे हात जोडून मनातले स्वप्न बाप्पाला सांगीतले आणि माझे स्वप्न पूर्ण झाले तर मी बाप्पाचे मंदिर त्या नगराच्या प्रवेशद्वारावर उभारीन, असा संकल्प केला. बरोबर दि. १ जानेवारी २०११ रोजी नगराचे भूमिपूजन केले आणि कामाला सुरुवात केली.

खिशामध्ये काहीही नसताना स्वत:चे एक नगर उभारायचे स्वप्नं पाहून व फक्त बाप्पावर श्रद्धा ठेवून कामाला लागलो. त्याच वर्षापासुन घरामध्ये गणेशोत्सवामध्ये गणपती बाप्पा विराजमान करु लागलो आणि शरद नगरमध्ये माघी गणेशोत्सव साजरा करु लागलो. हा माझ्या मध्ये झालेला खुप मोठा बदल होता. अनेकांनी त्याबाबत आश्चर्य

व्यक्त केले. २०११ पर्यंत मी नास्तीक होतो. माझी स्वतः वरच श्रद्धा होती. स्वतःच्या हिंमतीवर जिद्दीवर, मेहनतीवर व प्रामाणिक प्रयत्नांवर विश्वास होता. देवाला मी फारसा मानत नव्हतो. मात्र जेव्हा अशक्य वाटणारे काम हाती घेतले तेव्हा मात्र देवासमोर नतमस्तक होण्यावाचुन पर्याय राहिला नव्हता. कुणावर तरी श्रद्धा असावी लागते. मी अंधश्रद्धा पाळत नाही. मी कुठल्याही बाबा - बुवाला गुरु केलेले नाही की हातात कुठल्या खड्यांच्या अंगठ्या, गळ्यात माळा वा कुणी दिलेले गंडेदोरे कधीही बांधले नाहीत.

२०११ ला शरद नगर च्या उभारणीस सुरुवात करताना मात्र गणपती बाप्पावर मनोमन श्रद्धा ठेवली. ‘ माझे हे स्वप्न पूर्ण होऊ दे ’ अशी प्रार्थना वारंवार केली. आज २०२५ ला मी या निर्णयापर्यंत पोहचलोय की, कुणी कितीही नाकारले

तरी देव आहे. मी जेव्हापासून बाप्पाला मानायला लागलो, श्रद्धा ठेवु लागलो. तेव्हापासून या विषयाचा अभ्यास सुरु केला आणि प्रत्येकाने कुणावर ना कुणावर श्रद्धा ठेवलीच पाहिजे. कुणाला तरी साक्षी ठेऊन कुणासमोर तरी नतमस्तक होऊनच कार्याला प्रारंभ केला पाहिजे. कुणाला तरी घाबरलं पाहिजे, तरच हाती घेतलेलं कार्य पूर्ण होतं. हे मला उमगलं आणि मी गणपती बाप्पाला खुप मानायला लागलो. मात्र माझी श्रद्धा डोळस होती. आंधळेपणाने मी काहीही करत नव्हतो. म्हणूनच माझा बाप्पा सर्वांपेक्षा वेगळा होता. मी मानेन तसा होता. माझे हे ' शरद नगर ' उभारण्याचे स्वप्न त्याच्याच साक्षीने पूर्ण होतेय म्हणून तो माझा स्वप्नपूर्ती करणारा ' स्वप्नपूर्ती बाप्पा ' होता. शरद नगरच्या प्रवेशद्वारावरच त्यांचे मंदिर होतेय म्हणून तो शरद नगरचा ' शरदेश्वर ' बाप्पा झाला. माझ्या

बाप्पाची मुर्तीही खुप वेगळी आहे. बाप्पाला जास्वंदीचे फुल आवडते म्हणून तो जास्वंदीच्या फुलांच्या सिंहासनावर विराजमान झाला आहे. गणपती ही बुद्धीची देवता आहे. व्यासांनी सांगितलेले आणि गणपतीने लिहीलेले महाभारत प्रसिद्ध आहे. म्हणूनच माझा बाप्पा हातात ग्रंथ व पेन घेतलेला आहे. बाप्पाच्या चारही हातामधे शस्त्र नाही. एक हात आशिर्वाद देताना, दुसऱ्या हातामधे शंख, तिसऱ्या हातामधे ग्रंथ तर चवथ्या हातामधे पेन आहे. बाप्पा ग्रंथ लिहीताना बसलेला आहे, अशी ही मुर्ति आहे. ही मुर्ती जगभरात इतरत्र कुठेही आढळणार नाही. कारण, ती मी माझ्या पद्धतीने बनवून घेतली आहे, मुर्तीचे वजन ३०० किलो आहे. उंची ३ फुट आहे आणि राजस्थान मधील कलाकाराकडून मी खास बनवून घेतली आहे. माझा बाप्पा हा असा जगावेगळा आहे. माझ्या स्वप्नातला

हा बाप्पा आहे.

या बाप्पाच्या समोर नतमस्तक होवून एक भव्य – दिव्य स्वप्न पाहिले. ते कधी – काळी पूर्ण होईल की नाही याची कुठलीही शक्यता नव्हती. कारण जी जागा या नगरासाठी मी निवडली ती शहरापासून थोडी लांब ऐनशेत रोडवर होती. सर्वांनाच ती जागा लांब वाटायची. या जागेवर सुरुवातीला १० बिल्डींग बांधुन नगर उभारायचे असा प्लॅन होता. त्याबाबतची जाहिरात प्रसिद्ध होताच मला सर्वांनीच वेड्यात काढले " एकही फ्लॅट विकला जाणार नाही. एवढ्या लांब कोण जाईल? शहरामधे एवढ्या बिल्डींग आहेत. त्यांनाच ग्राहक मिळत नाहीत, तर तिकडे कोण घेईल ? " अशा नको त्या आणि नको तेवढ्या शंका विचारल्या जात होत्या.

मात्र याच शंका ' यशवंत नगर ' मधेही

'यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स ' उभारतानाही विचारल्या गेल्या होत्या. ज्या जागेवर लोकं संध्याकाळ होताच जायला घाबरायची, त्या जागेवर आजुबाजुला कुठलीही बिल्डींग नसताना आणि शहराच्या पूर्णपणे बाहेर असलेल्या जागेवर ही बिल्डींग बांधुन विकुनही दाखवली होती. त्यामुळे या शंका - कुशंकांचा अनुभव होता. सुरुवातीला खुप अडचणी येतात, हे ही माहिती होते. म्हणूनच डगमगलो नाही ' स्वप्नपुर्ती बाप्पा ' वर पूर्णतः श्रद्धा ठेवून अत्यंत नियोजन पूर्वक कामाला सुरुवात केली.

भुमीपुजनाच्या दोन महिने आधी म्हणजे दसऱ्याला प्रत्यक्ष जागेवर जाऊन एक जाहिरातीचा बॅनर लावला. लवकरच येथे शरद नगरची सुरुवात होणार आहे. दसरा ते १ जानेवारी या दरम्यान शरद नगरची जोरदार चर्चा घडवुन आणली. वृत्तपत्रामधूनही जाहीराती केल्या. पत्रके वाटली.

होर्डींग्ज लावली. ज्या – ज्या माध्यमातुन लोकांपर्यंत पोहचता येईल त्या – त्या माध्यमातुन लोकांपर्यंत पोहचलो. त्यामुळे ‘शरद पाटील आता नवीन बिल्डींग बांधतोय ’ ही चर्चा सर्वदूर पोहचली होती. त्याचा फायदा भुमीपुजनाच्या दिवशी झाला. भुमीपुजनाला मोठ्या संख्येने लोकं आली. ‘ यशलक्ष्मी कॉम्प्लेक्स ’ ही पहीली बिल्डींग वेळेत बांधुन विश्वास कमावला होता. त्या विश्वासाच्या बळावरच भुमीपुजनाच्या दिवशीच पहिल्या बिल्डींग मधील ३० पैकी १८ फ्लॅटची बुकींग झाली आणि स्वप्नपूर्ती बाप्पाने पहिला कौल दिला आणि मी जिंकलो. पहिल्याच दिवशी निम्म्याहुन अधिक फ्लॅट विकले गेल्याने झालेला आनंद हा अवर्णनिय होता. ग्राहकांनी विश्वास ठेवला होता. गेली अनेक वर्षे मी वाडा शहरामधे राहतोय. लोकं मला चांगल्या प्रकारे ओळखतात. ‘ शरद पाटील

यांनी एकदा का काम हाती घेतले की, तो ते पूर्ण करतोच आणि तो कुणाला फसवणार नाही, या दोन गोष्टींवर लोकांचा विश्वास होता. तोच विश्वास कामाला आला. इतर बिल्डरांनी बिल्डींग अपूर्ण ठेवल्या होत्या. कुणी अर्धवट कामे सोडून दिली होती. चार - चार वर्ष बिल्डींग पूर्ण होत नव्हत्या. अनेक ग्राहकांची फसवणूक झाली होती. चाळीतून फ्लॅटमधे यायचे सर्वांचे स्वप्न होते. मात्र बिल्डरांवर कुणाचाच विश्वास नव्हता. अशा वेळी 'आम्ही शब्द देतो, आम्ही शब्द पाळतो ' अशी जाहिरात करुन ग्राहकांना विश्वास दिला. त्यांनीही माझ्यावर विश्वास ठेवला.

मी स्वतःच खेडेगावातून आल्याने माझ्याही फ्लॅट बाबत काही संकल्पना होत्या. स्वप्न होती. त्यामुळे फ्लॅट घेणाऱ्याला नेमकं काय हवे ते मला कळत होतं. मी वाडा शहरात जेव्हा राहायला आलो

तेव्हा गॅस एजन्सी जवळच्या शिंदे चाळीत १५० रुपये भाड्याने एका छोट्याशा १० बाय १० स्क्वेअर फुटाच्या खोलीत राहत होतो. तेथेच एक टेबल व खुर्ची टाकुन ऑफिस थाटले होते. फ्लॅट घ्यायचे स्वप्न होते पण घेता आला नाही. म्हणून पहिल्या १०० स्क्वेअर फुट रुम पेक्षा थोड्या मोठ्या ३०० स्क्वेअर फुटच्या चाळीतील रुममधे पिक कॉलनीमधे राहायला गेलो. फ्लॅटचे स्वप्न मनामधे पिंगा घालत होते. मात्र ते शक्य होत नव्हतं. १९९० ते २००४ १४ वर्षे स्वप्न पाहण्यातच गेली. नंतर निश्चय केला, फ्लॅट घ्यायचाच. त्यावेळीही स्टेट बँक कामाला आली. बँकेने कर्ज दिलं आणि मग विठ्ठल मंदिराजवळील मशाल टॉवर मधे ५९० स्क्वेअर फुटाचा वन बिएचके फ्लॅट घेतला. गावातून शहरात, लहान रुम मधून मोठ्या रुममधे आणि मोठ्या रुममधून फ्लॅटमधे जाताना १४ वर्षांचा प्रवास

नजरे समोर होता. त्यामुळे फ्लॅटचे स्वप्न काय असते? आणि ते पूर्ण करायला सामान्य माणसाची हालत काय होते? हे मी खुप जवळून अनुभवले. म्हणूनच बिल्डर बनताना, एक नवे स्वतःचे नगर वसवताना खुपच विचार करून चांगले नियोजन केले.

या माझ्या नगरामध्ये काय हवे, काय नको? या बाबत आराखडे तयार केले. स्वप्नपूर्ति बाप्पाला स्मरुन कामाला सुरुवात करतानाच शपथ घेतली की, कुणाचीही फसवणूक होणार नाही, याची काळजी घेईन. सर्वांना सहकार्य करेन, ब्लॅकचा पैसा स्विकारणार नाही. सर्व व्यवहार पारदर्शक करेन. हे सर्व कठीण होतं. सुरुवातीला इतर बिल्डरांनी याची खिल्ली उडवली. बिल्डरचा धंदा कधीही पारदर्शक होऊ शकत नाही. मात्र मी तो करुन दाखवला. सुरुवातीपासुन आजपर्यंत मी एकाही

ग्राहकाकडून ब्लॅकमनी स्विकारलेला नाही. आता पर्यंत मी अनेक फ्लॅट विकलेत. अनेक कुटूंब आज शरद नगरमधे राहात आहेत. त्यापैकी एका ग्राहकाने तरी सांगितले की, मी त्यांच्याकडून चुकीच्या पद्धतीने पैसे घेतलेत किंवा त्यांची फसवणूक केलीय. तर त्याच दिवशी मी हा व्यवसाय बंद करेन. स्वप्नपूर्ति बाप्पाच्या आशिर्वादाने ती वेळ माझ्यावर आलेली नाही. बिल्डरचा व्यवसायही अत्यंत पारदर्शकपणे करता येऊ शकतो. हे मी दाखवुन दिले.

व्यवहारामधे विश्वास आणि पारदर्शकता आणताना अनेक नव्या योजना मी ग्राहकांच्या समोर ठेवल्या व हवे ते सहकार्य केले. त्यापैकीच सर्वात लोकप्रिय ठरलेली स्किम म्हणजे शुन्य टक्के व्याजदर. फ्लॅट घ्यायची प्रत्येकाचीच इच्छा असते मात्र गरीब व्यवसायीकांकडे इन्कमटॅक्स फाईल

**नसते. कागदपत्र नसतात. त्यामुळे बँका त्यांना कर्ज देत नाहीत. अशा लोकांसाठी ही स्किम मी राबवली. या स्किममधे अनेक ग्राहकांनी भाग घेतला.**

**या स्किम मधे ग्राहकांना ठरावीक हप्ता ठरवुन दिला नव्हता. त्यांना जमेल तसे पैसे त्यांनी एका ठरावीक कालावधीमधे द्यायचे. त्यामुळे जेवढी रक्कम फ्लॅटची असेल तेवढीच रक्कम आम्ही घ्यायचो. त्यामुळे व्याजाची झंझट आणि बँकांची कटकट उरलीच नाही. ग्राहकांचाही खूप फायदा झाला. माझ्याकडे फ्लॅट घेणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला सहकार्य केले. त्यामुळे नगरामधे फ्लॅट घेणाऱ्यांची संख्याही वाढली.**

“ धंदा प्रामाणिकपणे आणि मेहनतीने केला की, यश मिळतेच मिळते. आपण कुणाची फसवणूक केली नाही की, आपलीही कुणी फसवणूक करत नाही आणि पाळता येईल तोच शब्द इतरांना द्यावा,

खोटी आश्वासने कुणालाही देऊ नयेत " हे तत्व मी नगर उभं करतानाच अंगिकारल्याने लोकांचा विश्वास बसला. मग मी माझ्या स्वप्नातील नगर उभारायला सुरुवात केली.

माझ्या या नगरामधे सर्व जाती - धर्माची लोकं गुण्या - गोविंदाने नांदतील, त्यांच्यामधे कुठलेही हेवेदावे असणार नाहीत. वाद - विवाद होणार नाहीत. सर्वजण एकत्र येऊन नगराचा विकास करतील. सण - उत्सव आनंदाने व उत्साहाने साजरे करतील. संस्कृती, परंपरा जपतील. लहान - थोर सर्वच एकत्रीतपणे सर्व व्यवहार सुरळीत करतील. या नगरामधे चोऱ्या होणार नाहीत. चांगल्या प्रकारची सुरक्षा व्यवस्था असेल. पार्किंगची समस्या कुणालाही उद्भवणार नाही. मुलांना खेळायला मैदान, चांगला बगिचा, चांगले रस्ते, चोवीस तास पाण्याची सुविधा असेल, रस्त्यावर खड्डे असणार

नाहीत. हे नगर शहरामधे असेल तरीही शहरापासून लांब असल्याचा आणि वातावरण शांत असल्याचा आनंद मिळेल. गरीबातल्या गरीबालाही या नगरामधे फ्लॅट घेता येईल. फ्लॅटमधे चांगल्या सुविधा असतील आणि इमारतीचं बांधकाम उच्चप्रतीचे व दर्जेदार असेल.

माझ्या या नगरामधे माझ्या स्वप्नपूर्ती बाप्पाचे मंदिर असेल. लहानांपासून मोठ्यापर्यंत खेळण्याच्या व फिरण्याच्या सुविधा असतील. हे एक आदर्श नगर असेल. या आणि अशा अनेक बाबींचा अभ्यास करुन व स्वप्नपूर्ती बाप्पाला स्मरुणच नगराच्या उभारणीस सुरुवात केली.

पहिल्या इमारतीच्या भुमिपुजनालाच बाप्पाने आशीर्वाद दिला. चांगल्या लोकांनी फ्लॅटची बुकींग केली. त्यामुळे हुरुप वाढला. काम करायला उत्साह आला. ज्या दिवशी काम सुरु केले

त्या दिवसापासुन आजपर्यंत नगराच्या उभारणीचे बांधकाम थांबलेले नाही. अनेक अडचणी, संकटे आली मात्र बाप्पाच्या आशिर्वादाने सर्व काही सुरळीत झाले.

बाप्पाच्या अस्तित्वाचे अनेक अनुभव आले. जेव्हा – जेव्हा अडचणीमधे सापडलो. तेव्हा बाप्पाचे स्मरण करुन संकटांवर मात केली. म्हणूनच शरद नगर हे वाडा शहरातील सर्वांत चांगले नगर म्हणून लोकप्रिय झाले आहे. चांगल्या लोकांची राहण्यासाठी प्रथम पसंती ही या नगरालाच आहे. कारण या नगरामधे सुरक्षितता आहे, आनंद आहे, उत्साह आहे.

बाप्पाच्या आशिर्वादाने या सर्व गोष्टी शक्य झाल्या आहेत. माझी पात्रता नसतानाही मी स्वतःचं नगर उभारु शकलो, हे घडलं ते बाप्पावर ठेवलेल्या निस्सीम श्रद्धेमुळेच. बाप्पाला स्मरुन

अशक्य वाटणारे असे स्वप्न पाहिले आणि ते पूर्ण झाले बाप्पाच्या आशिर्वादानेच. ज्या बाप्पाने मला योग्य तो मार्ग दाखवला, माझ्या स्वप्नाची पूर्तता केली, त्याच बाप्पाने माझ्या सारख्या असंख्य सामान्य माणसांचीही स्वप्नपूर्ती करावी, हीच त्या मागची प्रामाणिक भावना आहे. शेवटी कर्तृत्वाला आणि मेहनतीला श्रद्धेची जोडही असायलाच हवी. तरच यश मिळेल, हे मी अनुभवांतुन शिकलोय. त्याची प्रचिती सर्वांनाच यावी, हीच प्रामाणिक इच्छा.

बाप्पाचे मंदिर बांधण्याचे विचार मनात घोळत होते. मंदिराचा प्लॅन तयार होता. फक्त सुरुवात कधी करायची हाच मोठा प्रश्न होता. खर्चाची जुळवा - जुळव होत नव्हती. पूर्ण मंदिराचा खर्च हातात ठेऊनच कामाला सुरुवात करावी, असे वाटत होते. एकदा मंदिराच्या कामाला सुरुवात केली की, काम थांबता कामा नये. पैशांची कमी पडता

कामा नये. इतरत्र मंदिरांची कामे वर्षानुवर्ष रखडलेली पाहत होतो. मात्र आपल्या बाप्पाच्या मंदिराचे काम रखडता कामा नये, असे ठरवुनच खर्चाचे सुयोग्य पद्धतीने नियोजन करण्याचा मार्ग बाप्पानेच दाखवला. त्यामुळे एकूण बांधकामाचा अपेक्षीत खर्च बाजुला ठेऊनच कामाला सुरुवात करणार होतो.

पैशांची अडचण दुर झाली मात्र नवीनच अडचण उभी राहिली. दि. ८ मे २०१४ हा दिवस भुमिपुजनाचा दिवस ठरला होता. त्याचे नियोजन मार्च २०१४ पासुन सुरु केले होते. मात्र त्याच दरम्यान शरद नगर मध्ये एका दुसऱ्या बिल्डरने गणपती बाप्पाच्याच मंदिराचे बांधकाम त्याच्या जागेमध्ये सुरु केले आणि मला धक्काच बसला. एकाच नगरात अवघ्या १०० मीटरच्या अंतरावर गणपती बाप्पाचीच दोन मंदिरे होणार होती. त्यामुळे

काय करायचे ? असा प्रश्न पडला. त्या बिल्डरला सांगुन पाहिले की, ‘ तुम्ही गणपती बाप्पा ऐवजी दुसऱ्या देवाचे मंदिर बांधा. कारण आम्ही बाप्पाच्या मंदिराचे आधिच नियोजन केलेले आहे. तसा प्रचारही झाला आहे. आमची तयारीही पूर्ण झाली आहे.’ पण त्यांनी उलट आम्हालाच सांगितले की, ‘ तुम्हीच दुसऱ्या देवाचे मंदिर बांधा.’ त्यांचे उत्तर ऐकुन पुरताच गोंधळुनच गेलो. त्यातच त्यांनी मंदिराच्या बांधकामास सुरुवातही केली. काय करावे ? हा मोठा प्रश्न होता. काही सुचत नव्हते. म्हणून ८ मे चा भुमिपुजनाचा सोहळा पुढे ढकलला. काहीतरी पर्याय निघेल, बाप्पाच योग्य तो मार्ग दाखवील, या आशेवर राहिलो.

बाप्पाच्या मंदिराच्या बांधकामाची सुरुवात आता कशी करायची ? या विचारामध्येच दोन महिने गेले आणि अचानक त्या बिल्डरने सुरु केलेले

मंदिराचे बांधकाम अपुर्णच राहीले. बांधकाम अर्ध्यावरच सोडून तो बिल्डर निघुन गेला. त्याच्या इमारतींच्या प्रोजेक्टला सुरुवात होण्या आधीच प्रोजेक्ट बंद झाला. शरद नगरची वाटचाल यशस्वीरीत्या सुरु असतानाच शेजारच्या प्रोजेक्टची मात्र वाताहात झाली होती. अनेक कारणांनी त्यांना प्रोजेक्ट बंद करावा लागला होता. त्यामुळे त्यांनी मंदिराचे बांधकामही अर्ध्यावरच सोडले होते. त्यांच्या मंदिराचे काम अपूर्ण राहाताच आम्ही कामाला लागलो आणि १ जानेवारी २०१५ हा दिवस भुमिपुजनाचा दिवस म्हणून निवडला.

श्रद्धापुर्वक जी इच्छा आपल्या मनामधे असते ती नक्कीच पूर्ण होते. तसेच झाले. बाप्पानेच दृष्टांत दिला आणि आता लवकरच माझ्या बाप्पाच्या मंदिराच्या बांधकामाचा प्रश्न आपोआप दुर झाला होता. मनावरचं मोठं ओझं हलकं झालं होतं.

**मंदिराच्या बांधकामास सुरुवात करण्याआगोदर मनामधे अष्टविनायक दर्शन करण्याची ईच्छा होती. मी प्रत्येक बिल्डींगच्या भुमिपुजनाआधी जेजूरीच्या खंडेरायाचे दर्शन घेऊन येतो. तेथुन आणलेला बेल – भंडारा भूमिपूजनाच्या जागेवर उधळतो. ती माझी श्रद्धा आहे. बाप्पाचे मंदिर बांधकामास सुरुवात करण्याआगोदर अष्टविनायक दर्शन करणे आवश्यक वाटले. म्हणून दि. २५ डिसेंबर २०१४ रोजी कुटूंबियांसह देवदर्शनाला निघालो. सलग तीन दिवस प्रवास करुन जेजुरीच्या खंडेरायांसह मोरगाव च्या श्री मयुरेश्वर, सिद्धटेकच्या श्री सिद्धीविनायक, पालीच्या बल्लाळेश्वर, महाडच्या श्रीवरदविनायक, थेऊरच्या श्री चिंतामणी, ओझरच्या श्री विघ्नहर, रांजणगावच्या श्री महागणपती व लेणाद्रीच्या गिरीजात्मक या देवस्थानांचे दर्शन घेतले. त्या मंदिरांतुन आपलेल्या फुला-प्रासादाचा भंडारा**

भुमिपुजनाच्या जागेवर उधळला आणि दि. १ जानेवारी २०१५ रोजी मोठ्या थाटामाटात व उत्साहात मान्यवरांच्या हस्ते भुमिपुजन केले. त्यावेळी आम्हाला झालेला आनंद अवर्णनीय असाच होता. माझ्या लाडक्या बाप्पाच्या मंदिराचे बांधकाम सुरु झाले होते.

बरोबर गुरुवार दि. १ जानेवारी २०१५ रोजी मंदिराच्या बांधकामास सुरुवात झाली. दरवर्षी फेब्रुवारी महिन्यामधे येणाऱ्या गणेश जयंतीला शरद नगर मधे माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहामधे साजरा होतो. त्यामुळे २०१६ च्या फेब्रुवारी महिन्याच्या आतमधे मंदिराचे बांधकाम पूर्ण होणे गरजेचे होते. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु होते. मंदिराचे बांधकाम भक्कम व दर्जेदार व्हायला हवे याकडे आमचे पूर्ण लक्ष होते.

मंदिराचे खोदकाम १२ फुटापर्यंत खोल

केले आहे. एकूण ११५५ स्क्वेअर फुटाच्या मंदिराचा पाया हा १५ कॉलमचा आहे. १०''६'' X १०'' ६'' फुटाचा गाभारा आहे. तर १४ '' X १८'' फुटाचा सभा मंडप आहे. मंदिराचा पाया जमीनीपासुन ४ फुट उंचावर आहे. तर मंदिर पूर्व – पश्चिम असे बांधले आहे. मंदिराला एकूण ८ कळस आहेत प्रमुख कळस १८ फुटांचा आहे. छोटा कळस ९ फुटांचा तर ३ फुटांचे ६ छोटे कळस आहेत. एकूण मंदिराचे बांधकाम अत्यंत काळजीपुर्वक केले गेले आहे. मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा गणेश जयंतीच्या दिवशी म्हणजे गुरुवार दि. ११ फेब्रुवारी २०१६ रोजी ठेवण्यात आले आणि मंदिराचे पूर्ण बांधकाम दि. ३१ डिसेंबर २०१५ रोजी पूर्ण झाले. अवघ्या वर्षभरामधे कुठलाही अडथळा न येता मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले.

मंदिर बांधतानाच हे मंदिर मी स्वखर्चाने

बांधणार आहे, असे ठरवले होते. मंदिराच्या बांधकामाला एकूण ११ लाख रुपये खर्च येईल,असा आमचा प्राथमिक अंदाज होता. मात्र तो वाढत गेला आणि २१ लाखांवर पोहोचला. मात्र पैशांची अडचण भासली नाही. शरद नगरचे फ्लॅट विकुन जो नफा झाला तो मंदिराच्या बांधकामासाठी वापरला. बाप्पानेच पैशांची कमतरता भासु दिली नाही. त्यामुळे बांधकाम पैशांमुळे अडुन राहिले नाही. वेळेच्या आधीच बांधकाम पूर्ण झाले. मंदिरासाठी कुणाकडूनही देणगी घेतलेली नाही की मदत म्हणून काही स्विकारलेले नाही. माझ्या स्वप्नात होते तसे मंदिर मी बनवुन घेतले.

मंदिर बांधतांना अनेक शंका - कुशंका मनामधे होत्या. शेजारचेच मंदिर अपुर्ण राहिले होते. अर्धवट बांधकाम कोसलुन पडले होते. त्यामुळे मंदिराच्या बांधकामाबाबत अनेक गोष्टी सांगितल्या

जात होत्या. मंदिर हे कुणाच्याही हातुन पूर्ण होत नाही. देवाची इच्छा असली तरच ते पूर्ण होते. नाहितर कितीही प्रयत्न करा यश येत नाही. विविध प्रकारचे अडथळे व संकटे येतात. त्यामुळे मनामधे खुप भिती होती. मात्र बाप्पाच्या मंदिराचे काम सुरु केल्यापासून कुठल्याही प्रकारचे अडथळे आले नाहीत की कुठलेही संकट आले नाही. उलट ठरलेल्या वेळेच्या आधी मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले तेही माझ्या मनासारखे.

मंदिर बांधकामावर शरद नगर मधील रहिवाशी मंडळींचेही पूर्ण लक्ष होते. मंदिर जस - जसे आकाराला येत होते. तस - तसा सर्वांचाच उत्साह वाढत होता. आत तर हे मंदिर प्रसिद्ध झाल्याने शरद नगरचे रंग - रुपच पालटले आहे. माझ्यासहित सर्वांच्या मनामधे मंदिराबाबतच्या वेगवेगळ्या कल्पना आहेत. बाप्पाच्या आशिर्वादाने

त्या सर्व पूर्ण होतील अशी आशा आहे. या मंदिराचे पावित्र राखले जावे, मंदिरामध्ये रोज पुजा - आर्चा व्हावी. भजन - किर्तनाची ओढ भावी पिढीला लागावी, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

गेली अनेक वर्ष मी पत्रकारीतेच्या क्षेत्रामध्ये आहे आणि तेवढीच वर्ष मी सामाजिक कार्यामधेही आहे. विविध संस्था, संघटनांच्या माध्यमातुन अनेक स्वरुपाची सामाजिक कार्य मी सातत्याने करत असतो. हिच सर्व सामाजिक कार्य आता मंदिराच्या माध्यमातुन करण्याचा प्रामाणिक हेतु आहे. यापुढे सर्व मंदिराची उत्तोरोत्तर वाढ व्हावी. यासाठी प्रयत्न करणे, गोर - गरीब, गरजुंना मदतीचा हात देणे, शैक्षणिक उपक्रम राबवणे याबरोबरच चांगले संस्कार असणारी संस्कारक्षम पिढी निर्माण करणे, असे अनेक उपक्रम आम्ही हातामधे घेणार आहोत. बाप्पाच्या आशिर्वादाने शरद नगरमधे राहायला

आलेली सर्व रहिवाशी मंडळी ही हौसी व उत्सवप्रेमी आहेत. त्यांच्यामधे एकोपा आहे. संघटीतपणे काम करण्याची त्यांची वृत्ती आहे. त्यामुळेच बाप्पाच्या मंदिराच्या माध्यमातुन खुप काही करता येईल असे वाटते. म्हणूनच फक्त मंदिर बांधले म्हणजे झाले, असे न होता आता तर खरी सुरुवात आहे. पुढचे पूर्ण आयुष्य बाप्पाच्याच चरणी आहे. आता बाप्पाच आमचे सर्वकाही आहे. खुप श्रद्धेने सर्वकाही केलेय. त्याची प्रचीतिही आम्हाला आलीय, आता जो काही आहे तो बाप्पाचाच, याच भावनेने कार्यरत राहणार आहोत.

खिशामधे काहीही नसताना एक स्वप्न पाहिलं. ते स्वप्न बाप्पाच्या आशिर्वादानेच पूर्ण झालं. आजच्या घडीला मंदिरामधे रोज भाविक येतात. बाप्पा समोर उभे राहुन डोळे मिटतात व शांतपणे बाप्पाचे स्मरण करतात. विनम्रपणे हात

जोडून आपले स्वप्न मनातल्या मनात बाप्पाला सांगतात. त्या स्वप्नांचा प्रामाणिकपणे व मेहनतीने पाठलाग करतात आणि त्यांचे स्वप्न पूर्ण होते म्हणूनच शरद नगरच्या स्वप्नपूर्ती बाप्पाची प्रसिद्धी सर्वदूर पोहचली आहे.

कालपर्यंत बाप्पा फक्त माझा होता आता तो सर्वांचाच झालाय. बाप्पाने जो प्रसाद आम्हाला दिलाय. जो दृष्टांत आम्हाला दिलाय, तोच सर्वांना मिळावा, सर्वांच्याच जीवनामधे सुख – शांती व समृद्धी नांदावी, सर्वांच्याच स्वप्नाची पूर्तता व्हावी, हिच प्रार्थना बाप्पाजवळ नेहमी करतोय आणि बाप्पाची सेवा मरेपर्यंत विनम्रपणे करण्याची संधी मिळावी, हिच इच्छा व्यक्त करतोय. ■

# ‘ शरद नगर ’ ने विश्वास आणि प्रेम कमावलं

“ घर असावे घरासारखे,
नकोत नुसत्या भिंती
तिथे असावा प्रेम जीव्हाळा,
नकोत नुसती नाती.”

वयात आलेल्या प्रत्येकाचचं एक स्वप्न असतं की, ‘ छोटसं का होईना पण स्वत:चं एक सुंदर घर असावं. घराला फक्त भिंती नकोत तर तिथे प्रेम जीव्हाळा असावा,’ मात्र सध्याच्या फसवा – फसवीच्या जमाण्यात विश्वास कुणावर ठेवावा ? आपल्या कष्टाचे पैसे कुणी लुबाडले तर ? पोलीसांकडे कसे जाणार ? न्यायालयामधे दाद कोण मागणार ? तिथे तर श्रीमंतानाच न्याय मिळतो.

बिल्डरच्याच बाजुने निकाल लागतो. म्हणूनच कुठलेही झंझट मागे न लागता आणि कुठल्याही प्रकारचा त्रास न होता जर घर घ्यायचेच असेल तर मग ' शरद नगर ' मधेच घ्या, असा सल्ला सर्वांस दिला जातो, यामागचे प्रमुख कारण म्हणजे, गेल्या २५ वर्षांमधे आम्ही आमच्या ग्राहकांचा कमावलेला विश्वास.

व्यवहारामधे प्रचंड पारदर्शकता असल्याने आणि संपूर्ण व्यवहार ' व्हाईट ' मधेच केल्याने आजपर्यंत कुणाचीही फसवणूक झालेली नाही. ती कधीही होणार नाही. आम्ही कधीही ब्लॅकचे पैसे स्वीकारलेले नाहीत. आम्ही ज्या दिवशी कन्स्ट्रक्शन व्यवसायामधे उतरलो, त्याच दिवशी ठरवलं होत की, ' माझा एक जरी ग्राहक बोलला की शरद पाटील यांनी मला फसवलं, त्याच दिवशी मी माझा व्यवसाय बंद करेन.' या आशयाचा मजकुर मी

माझ्या शरद नगरच्या प्रसिद्धी पत्रकामधेही वारंवारं प्रकाशित केला आहे.

गेल्या २५ वर्षांत शेकडो ग्राहकांना फ्लॅट विकले मात्र आज पर्यंत आमचा एकही ग्राहक आमच्या विरुद्ध पोलीस ठाण्यामधे साधी तक्रारही करायला गेलेला नाही. कोर्टांत जायची तर वेळ कुणावर कधीच आली नाही. माझ्याकडूनही कधी कुणाला नोटीस गेली नाही की, व्यवहारावरुन कधी कुणाशी वाद झालेला नाही. व्यवहाराच्या सुरुवातीलाच जे काही असेल ते खरं – खरं सांगीतलं जातं. कुठलीही लपवा – छपवी न करता स्पष्टपणे ग्राहकांशी बोललं जातं. जे बोलतो ते फाईलवर लिहून दिलं जातं. दिलेला प्रत्येक शब्द कटाक्षाने पाळला जातो.

'आम्ही शब्द देतो - आम्ही शब्द पाळतो' हे आमच्या व्यवसायाचे ब्रिद वाक्य आहे. आजपर्यंत

कधीही दिलेला शब्द टाळला नाही. ती वेळच कधी आली नाही. प्रत्येक वर्षी आम्ही आमच्या जाहिरातींमधूनच आमचे दर जाहीर करतो. ज्या ॲमीनीटीज देणार आहोत, त्यांचाही स्पष्ट उल्लेख करतो. बुकिंग करतानाच आम्ही दोन एक सारख्या फाईल बनवतो. एक फाईल ग्राहकाला देतो व दुसरी आमच्याकडे ठेवतो. त्यामधे सर्वकाही पारदर्शक व साफ - साफ लिहिलेलं असतं. त्यामुळे कुणाची फसवणूक होण्याचा प्रश्नच येत नाही. म्हणूनच ग्राहकांचा विश्वास आम्ही कमावला आहे. नुसता विश्वासच नाही तर प्रेमही मिळवलं आहे, हे आम्ही अभिमानाने सांगतो.

आम्ही पैसे कमावण्यासाठी फ्लॅट विकलेले नव्हते तर नाव कमावण्यासाठीच हा अट्टाहास केला होता. नाव तर मिळालच पण तोटा ही झाला नाही. यश आपसुकच मिळत गेलं. ‘ शरद नगर ’ च नाव

सर्वदूर पोहचलं.

घर घेणाऱ्या प्रत्येकाचा एक उद्देश असतो. तो फक्त ‘ शरद नगर ’ मधेच सफल होतो. कारण मोठ्या कष्टाने, पै – पै जमवून मनासारखं घर घेतलं मात्र तिथे फक्त भिंतीच असतील तर तिथे राहायला कंटाळवानं होतं. मग रडत – खडत जगणं सुरु होतं. त्या घरामधे प्रेम हवे, जीव्हाळा नांदावा. नात्यांमधून ओळावा झिरपावा. नुसती नाती असून चालत नाही तर ती नाती जीवापाड जपणारी, एकमेकांना सांभाळणारी, सुख – दुःखामधे सहभागी होणारी माणसं जवळ असावी लागतात. शरद नगर मधे नेमकं तेच निर्माण करण्याचे स्वप्न आम्ही पाहिलं आणि ते स्वप्न या नगरामधे राहणाऱ्या सर्व रहिवाशी मंडळींनी पूर्ण केलं. म्हणून आम्ही नेहमी म्हणतो, “ शरद नगर उभारताना पैसा कमावलाच पण त्याचबरोबर प्रेम आणि विश्वास ही कमावला.”

‘ शरद नगर ’ च्या सुरुवातीपासुन मी या नगरामधे राहणाऱ्या प्रत्येक महिलेला दरवर्षी न चुकता दिवाळीमधे ‘ भाऊबीज ’ करतो. तर रक्षाबंधनला नगरातील महिला मला राखी बांधतात. बिल्डर आणि रहिवाशी मंडळी यांच्यामधील हे नातं फारसं कुठे पाहायला मिळत नाही ते ‘ शरद नगर ’ मध्ये पाहायला मिळतं. या नगरामध्ये ज्यांनी – ज्यांनी फ्लॅट घेतले ते सर्वजण चांगल्या प्रकारे नगरामध्ये वर्तन करतात. एकमेकांशी सौजन्याने वागतात. गुण्या – गोविंदाने राहतात. त्यामुळे शरद नगर मधील रहिवाशी हे खऱ्या अर्थाने शरद नगरच्या नावलौकिकामध्ये नेहमीच भर घालत आहेत.

कायम स्वरुपी वास्तव्य करण्यासाठी प्रतिष्ठीत व चांगल्या स्वभावाची, विचारी माणसं शरद नगरचीच निवड करतात. तिथे ते शांततेने

राहतात. आपलं जीवन चांगल्या पद्धतीने जगतात. मी जरी बिल्डर असलो, नावजलेला पत्रकार – संपादक असलो तरी शरद नगर मधे प्रवेश करताच मी सर्व काही विसरुन त्यांच्यातलाच एक होऊन जातो. रोज संध्याकाळी मी स्वतः शरद नगर मधे जातो. तेथील समस्या जाणून त्या प्रामाणिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येकाच्या सुख दुःखामधे माझे कुटूंबिय सहभागी होतात. म्हणूनच आपल्या गावापासून व कुटूंबीयांपासून दूर असलेल्या या रहिवासी मंडळींना ‘ शरद नगर ’ हे आपलचं गाव आहे. नगरातील रहिवाशी माणसं ही आपलेच नातेवाईक आहेत, असे सातत्याने वाटतं, ‘शरद नगर’ उभारण्यामागच खरं यश हेच आहे. ■

# गरीबांच्या स्वप्नातील घर : शरद नगर

वयात येणाऱ्या प्रत्येकाचचं ' स्वत:च स्वतंत्र घर असावं ' असं एक स्वप्न असतं. त्या स्वप्नाच्या मागे सर्वजन पळत असतात. रात्रं - दिवस कष्ट करत असतात. अनेकांची स्वप्न पूर्ण होतात तर काहींची स्वप्न अपूर्णच राहतात. गरीबीमधे जन्माला आलेल्यांना मात्र घराचं स्वप्न पाहात - पाहात ताटकळत रहावं लागतं. खुप परीश्रम करावे लागतात. बिल्डर गरीबांना कुठलेच सहकार्य करायला तयार नसतात. त्यामुळे त्यांनी पाहिलेल्या स्वप्नांची अक्षरश: माती होते. तर काहिंना हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आख्खं आयुष्य खर्ची घालावं लागतं.

मी प्रचंड गरीबीमधुन आलोय. दारीद्रय

वयाच्या १७ वर्षांपर्यंत अनुभवलयं. गरीबी खुप वाईट असते. गरीबाचं कुणीही नसतं, हेही त्याचवेळी उमगलंय. वाडा तालुक्यातील पिक या छोट्याशा खेडेगावातील एका झोपडीमधे माझं बालपण गेलं. वडीलांच्या आजारपणामुळं आईने अक्षरशः इतरांच्या शेतावर मजुरकरासारखं काम करुन आम्हाला वाढवलं. डहाणूतील शासकीय वसतीगृहामधे शालेय शिक्षण झालं. कोसबाड येथे दोन वर्षांचा कृषी कोर्स केला. त्यानंतर पुन्हा गावामधे आलो तो एक भलं मोठ्ठ स्वप्न घेऊन ‘ गरीबीमधे जन्माला आलो तरी गरीबीमधे मरणार नाही,’ हे शालेय वयातच मनावर बिंबवलं होतं. त्यामुळे कीतीही परीश्रम करायची तयारी होती. म्हणून गाव सोडला.

वाडा शहरात आलो तो नेसत्या वस्त्रानिशी. खिशात नया पैसाही नव्हता. एसटी स्टँडवर झोपलो,

नंतर मामाकडे ऐनशेतला रहायला गेलो. खाजगी नोकरी करत पुन्हा वाड्यात रहायला आलो तो एका छोट्याशा चाळीत. पातकर गॅस एजन्सीजवळ एक शिंदे चाळ होती. त्या चाळीतील एका १०० स्क्वेअर फुटाच्या रुममधे रहायला लागलो. तिथुनच १९९४ मधे ' शब्द मशाल ' हे वृत्तपत्र सुरु केलं. १९९६ मधे पिक कॉलनी मधील कोटाच्या चाळीत ३०० स्क्वेअर फुटाची रुम भाड्याने घेऊन तिथे रहायला गेलो. या छोट्याशा चाळीमधेही ८ वर्ष काढली. त्यानंतर २००४ मधे ५०० स्क्वेअर फुटाचा 1 BHK फ्लॅट विठ्ठल मंदिराजवळील एका बिल्डींग मधे घेतला. मग तिथे राहायला गेलो. दोन वर्षानंतर तिथेच दुसरा एक फ्लॅट घेऊन पहिल्या मजल्यावर ' शब्द मशाल ' वृत्तपत्राचं कार्यालय सुरु केलं.

पिक गावातील झोपडी, चाळ ते फ्लॅट पर्यंतचा प्रवास करायला १९९० ते २००४ असा

चक्क १४ वर्षांचा काळावधी लागला. या १४ वर्षांच्या प्रवासात खुप सोसलं, खुप भोगलं. अनेक अनुभव आले. १४ वर्ष फक्त फ्लॅटच स्वप्न पाहात राहिलो. फ्लॅट मधे राहायला आल्यावर कळलं की, चाळीतील संस्कृती आणि फ्लॅटमधील संस्कृती यामधे जमीन – अस्मानाचा फरक आहे. चाळीमधे एक सारखीच गरीब लोकं राहतात. त्यामुळे प्रगती खुंटते. स्पर्धा थांबते. चाळीतील जीवन नकोसं वाटतं. अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं. नको ते कानावर पडतं. म्हणूनच प्रत्येकाला चाळीतुन फ्लॅटमधे यावसं वाटतं. पण ते बऱ्याचदा शक्य होत नाही.

१४ वर्षांचे चाळीतील अनुभव लक्षात घेऊनच ज्याची फ्लॅट घ्यायची इच्छा आहे, त्याला फ्लॅट घेता आला पाहिजे, असा मनाशी निर्धार करुन एक स्वप्न पाहिलं, स्वतःच्या नावाचं नगर

उभारायचं, तिथे गरीबातल्या गरीब माणसाला आणि श्रीमंत – धनाढ्य इसमांनाही फ्लॅट घेता आला पाहिजे. गरीब – श्रीमंत एकत्र राहिले पाहिजेत तरच गरीबांचेही विचार बदलतील. गरीबांची मुलं जेव्हा श्रीमंत मुलांच्या सोबत वावरतील, खेळतील तेव्हाच तीही श्रीमंताप्रमाणे वागायला लागतील. स्पर्धा करायला शिकतील. मात्र श्रीमंतांना गरीबांची सोबत नको असते. गरीबांचा शेजार श्रीमंताना आवडत नाही. श्रीमंत लोकं श्रीमंत वस्तीमधेच घर घेतात. तर गरीब गरीबांच्या वस्तीमधेच नाईलाजास्तव रहायला जातात. बिल्डरही फ्लॅटची रचना करताना श्रीमंतासाठी 2 BHK, 3 BHK तर गरीबांसाठी 1 RK, 1 BHK अशी रचना करुन तशा स्वतंत्र बिल्डींग बांधतात. मला हे सतत खटकत होतं. गरीब व श्रीमंत हे एकत्रच, एकाच बिल्डींगमधे राहायला हवेत. असं वाटत होतं. म्हणूनच माझ्या नगराची

रचना करताना 1 RK, 1 BHK, 2 BHK व 3 BHK एकाच मजल्यावर येतील अशी केली. 1 RK हा फ्लॅट अवघा ३१० स्क्वेअर फुटाचा व ३ लाख रुपयांपर्यंत विकता येईल या मापाचा ठेवला. पहिल्याच राजलक्ष्मी कॉम्प्लेक्स या बिल्डींगमधे हा प्रयोग यशस्वी झाला. या बिल्डींगमधे गरीबातल्या गरीब ग्राहकांनी व श्रीमंत ग्राहकांनीही फ्लॅट घेतले. शासकीय कार्यालयामधे काम करणारा शिपाई व अधिकारी एकाच मजल्यावर रहायला लागले. त्यांची मुलं एकत्र खेळायला - वावरायला लागली. गरीब - श्रीमंत ही दरी कमी झाली.

शरद नगर उभारतानाच या नगरमधे कुठलाही जातीभेद, धर्मभेद वा इतर कुठलाही भेद पाळला जाणार नाही. सर्वजन गुण्यागोविंदाने नांदतील. एकमेकांशी सन्मानाने वागतील असा

नियम बनवला. फ्लॅट घेतानाच तशा सुचना दिल्या. ‘ आम्ही संस्कृती जपतो - आम्ही परंपरा पाळतो ’ या घोषवाक्याखाली सर्वांना एकत्र आणलं आणि सर्व सण – उत्सव साजरे करायला सुरुवात केली. त्यामुळे सर्वांची मनं जुळली. एकोपा वाढला. इतर कुठेही जे वातावरण दिसत नव्हतं ते शरद नगर मधे पहिल्या दिवसापासुन दिसायला सुरुवात झाली. या नगरामधे एक मुस्लीम समाजाचे अधिकारी राहायला आले. आयुब तांबोली हे वाडा तहसिल कार्यालयामधे नायब तहसिलदार पदावर होते. त्यांना आम्ही आमच्या नगराचे नियम समजावून सांगितले. त्यांना ते पटले. ते आमच्या नवरात्रौत्सव मंडळामधे पदाधिकारी झाले. नवरात्रीमधे नऊ दिवस ते मंदिरातील आरतीमधे सहभागी झाले. एक मुस्लीम समाजाचा व्यक्ती शरद नगरमधे देवीची आरती करतो, हे पाहुन सुरुवातीला खळबळ माजली. मात्र

शरद नगरचा विषय असल्याने कुणीही तोंड उघडलं नाही. उलट सर्वत्र कौतुक झालं.

आता शरद नगर मधे एक मुस्लीम कुटूंब राहतोय. फारुख शेख यांचे. तेही नवरात्रीमधे सहकुटूंब देवीची आरती करतात. शरद नगर मधे प्रवेशद्वारातच स्वप्नपूर्ती गणपती बाप्पाचे मंदिर आहे. या मंदिरामधे होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमामधे ते सहभागी होतात. त्यांना तिन मुली आहेत, त्याही हिंदुंच्या सर्व सणांमधे सहभागी होतात. गरबा खेळतात. मंदिरामधे साजरा होणाऱ्या रक्षाबंधन, भाऊबीज व अन्य कार्यक्रमामधे आनंदाने सहभागी होतात.

हे मुस्लीम कुटूंबीय रहायला आले त्यावेळी मंदिरामधे रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा होत होता. मंदिरामधे बाप्पाच्या मूर्तीसमोर खुर्चीवर बसलो होतो आणि नगरातील महिला मला राखी बांधत होत्या.

हे पाहुन नेहा फारुख शेख याही राखी घेऊन आल्या. मी मंदिरातुन उठून खाली जायला लागलो, त्यावेळी नेहा शेख यांनी सांगीतले की, “ मीच येते. इतर महिला ज्या ठिकाणी राखी बांधतात. तेथेच मी राखी बांधेन.” त्या आल्या आणि स्वप्नपूर्ती गणपती बाप्पा समोर माझ्या हाताला राखी बांधली.

एका मुस्लीम महिलेने गणपती मंदिरामधे माझ्या हाताला राखी बांधून शरद नगरची परंपरा जपली. मी दरवर्षी शरद नगरमधील सर्व महिलांना पहिल्या वर्षापासुन भाऊबिज करतो. गेल्या १४ वर्षामधे त्यात काधिही खंड पडलेला नाही. दरवर्षी भाऊबिजेचा कार्यक्रम मंदिरामधेच साजरा होतो. त्यामधे नेहा शेख याही आनंदाने सहभागी होतात. मीही दरवर्षी त्यांना भाऊबिज करतो. हे एक वेगळ व आदर्श उदाहरण शरद नगर मधे पाहायला मिळते. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

कुठल्याही जातीचा वा धर्मांचा भेद या नगरामधे केला जात नाही. सर्वजन आपल्या जातीची- धर्मांची संस्कृती - परंपरा पाळतातच पण नगरातील सर्व सण - उत्सवांमधे कुठलाही भेद न पाळता सहभागी होतात, हे या नगराचे खरे वैशिष्ट्य आहे. गरीब - श्रीमंत ही दरी आम्ही संपवली आहे. त्यामुळे गरीब लोकंही सन्मानाने या नगरामधे वावरतात. प्रतिष्ठेच व सन्मानाचं जीवन जगतात. एकोपा राखुन आनंदी जीवन राहतात. शरद नगर मधील एकोपा तर वाखानण्याजोगा आहे. कुणा एकावर संकट आलं, दुःखद प्रसंग घडला तर पूर्ण नगर त्याच्या पाठीशी सर्व ताकतीन खंबीरपणे पाठीशी उभं राहतं. नुकताच एका महिलेचे आजारपण अचानक वाढले. दवाखान्याचा खर्च जास्त होता. नगरातील सर्वांनी वर्गणी काढुन त्यांना मदत केली. प्रत्येकाच्या सुख - दुःखामधे सर्व

नगरवासीय सहभागी होतात. एवढं चांगल वातावरण इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाही.

शरद नगर मधील सर्व नगरवासीय एकत्र येऊन एक रहिवाशी मंडळ स्थापन केले आहे. महिलांचे जय जिजाऊ महिला मंडळ आहे. तर तरुण मुलांचे युवक मंडळ आहे. प्रत्येक सण – उत्सवाच्या वेळी एक वेगळी कार्यकारीणी एकमताने निवडली जाते. प्रत्येक फ्लॅट मधुन वर्गणी जमा करुन कार्यक्रम साजरे केले जातात. नगरामधे सर्वजण समान पातळीवर असतात. कुणी मोठा नाही, की कुणी छोटा नाही. सर्वांना समान अधिकार.

मी स्वतः माझ्या कुटूंबीयांसह सर्व कार्यक्रमांमधे उत्साहाने सहभागी होतो. रोज संध्याकाळी नगरामधे राऊंड मारतो. समस्या – अडचणी जाणून घेतो. माझे आणि नगरवासीयांचे अत्यंत सलोख्याचे व जिव्हाल्याचे संबंध निर्माण

झाले आहेत. नगरात प्रवेश करताच आम्ही नगरवासीयांपैकीच एक होऊन जातो. त्यांच्यात रमतो. एक बिल्डर व रहिवासी असे न वागता त्यांच्या घरातल्या सदस्या प्रमाणेच आमचे वागणे असते. त्यामुळे प्रत्येकाशी घरच्यांप्रमाणे संबंध आहेत. मी मला हवं तसं नगराला रुप दिलं आहे. जे – जे करायला हवं ते – ते कुठेही हात आखडता न घेता खुल्या दिलाने केलं आहे. रहिवाशांना कुठलीही अडचण भासु नये, यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो.

शरद नगरमधे पूर्ण देशातील प्रत्येक राज्यातील नागरीक आनंदाने राहतात. वेगवेगळ्या जिल्ह्यातील, राज्यातील लोकं कशी एकरुप होऊन वागतात, हे पाहायचे असेल तर शरद नगर हे उत्तम उदाहरण आहे. नगरामधे राहायला येणारी सर्व रहिवासी मंडळी सुसंस्कृत व प्रतिष्ठीतपणा जपतात.

ग्राहकांशी बोलतात. व्यवहार करतात. बिल्डर कधीतरी ग्राहकांच्या समोर येतो. त्याचा खरेदी - विक्रीमध्ये फारसा सहभाग नसल्याने तो कुठल्याच गोष्टीला जबाबदार नसतो. त्याचा संबंध फक्त पैशांशी. पैसे घेतले की तो मोकळा होतो.

एकदा का बिल्डींग बांधून झाली, फ्लॅटचा ताबा दिला की, त्याचा संबंध रहिवाशी मंडळीशी संपतो. आम्ही मात्र ग्राहक फ्लॅट खरेदी करायला आल्यापासून त्यांच्याशी जोडले जातो. सतत त्यांच्याशी संपर्क ठेवतो. त्यांच्या सुख - दुःखामधे सहभागी होतो. नगराची व त्यांना विकलेल्या प्रत्येक फ्लॅटची जबाबदारी घेतो. आमच्याकडून कुणाचीही फसवणूक होणार नाही, याची पुरेपुर काळजी घेतो. त्यामुळे आमच्याकडून आजपर्यंत कुणाचीही फसवणूक झालेली नाही. दिलेला प्रत्येक शब्द तंतोतंत पाळला आहे. म्हणूनच बिल्डर व रहिवाशी

त्यामुळे शरद नगर ही शहरातील एक चांगली वस्ती निर्माण झाली आहे. कुणालाही चांगल्याच वस्तीमधे रहायला आवडतं. चांगल्या लोकांच्या सहवासामधेच प्रगती होते. म्हणूनच कायमस्वरुपी वास्तव करु इच्छिणारी लोकं शरद नगरमधेच फ्लॅट घेतात. फ्लॅट विकत घेणाऱ्या प्रत्येकाशी आमचं एक वेगळं नातं निर्माण झालेले आहे. त्यांचा व्यक्तीशः माझ्यावर विश्वास बसला आहे. मी अगदी सुरुवातीपासुनच या नगराची जाहिरात करताना स्वत:चा फाटो व स्वत:चे मोबाईल क्रमांक देऊन करतो आहे. प्रत्येक ग्राहकाशी मी स्वत: बोलतो, स्वत: व्यवहार करतो, प्रत्येकाला भेटतो. त्यांच्या समस्या जाणून घेतो, वेळप्रसंगी मदतही करतो, असं कुठल्याही बिल्डरच्या बाबतीमधे घडत नाही.कारण बिल्डर कधीही ग्राहकांसमोर येत नाही. तो फ्लॅट विक्रीसाठी पगारी नोकर ठेवतो. हे नोकरच

यांचं एक वेगळं नाते निर्माण झाले आहे. योजनाबद्ध पद्धतीने निर्माण केलेलं शरद नगर हे पहिलं गृहसंकुल ठरलं आहे. म्हणूनच गरीबातल्या गरीब माणसापासून ते श्रीमंत माणसापर्यंत कुणालाही फ्लॅट घ्यायचा असेल तर तो पहिली पसंत शरद नगरलाच देतो.

ज्यांच्याकडे खरचं फ्लॅटची बुकींग करायलाही पैसे नव्हते, ते आता या नगरामध्ये फ्लॅटचे मालक झालेले आहे. छोटा का होईना पण स्वतःच्या हक्काचा फ्लॅट त्यांनी घेतला आहे. पेट्रोल पंपावर काम करणारा शैलेश सिंग, डोक्यावर भांडे घेऊन गावोगावी फिरणारी पवार मावशी, रस्त्यावर बसुन छोट्या - छोट्या वस्ता विकणारी गोसावी काकी,कंपनीमधे तुटपुंजा पगारावर काम करणारे कामगार आणि टपरी चालवणाऱ्या टपरी मालकांनीही शरद नगर मधे फ्लॅट घेतले आहेत.

**या छोट्या लोकांबरोबरच गर्भ श्रीमंत धनाढ्यांनी या नगरामधे बंगलो खरेदी केले आहेत. एक रुम व किचनचा ३१० स्क्वेअर फ्लॅट घेतलेला फ्लॅटधारक आणि 3 BHK बंगलो असलेला बंगलो मालक, दोन – दोन फ्लॅट घेऊन ते एकत्र करुन 4 BHK मधे राहणारे फ्लॅटधारक हे सर्वजन एकच मजल्यावर आनंदाने राहतात.**

मला नगर उभारतांनाच गरीब - श्रीमंत हा भेद मिटवायचा होता. त्यांच्यामधील दरी कमी करायची होती. ती करण्यात मी कमालीचा यशस्वी झालो. म्हणूनच गरीबातला गरीब माणूसही फ्लॅट घेण्याचे धाडस करतोय. तर एक सुरक्षित नगर, चांगले नगर, चांगली वस्ती पाहुन अनेक वरीष्ठ **शासकीय अधिकारी व श्रीमंत लोकंही या नगरामधे राहायला येतात.** वाडा शहरामधे राहण्यासाठी योग्य ठिकाण कोणते? असे विचारल्यास शरद नगर हेच

उत्तर सर्वांच्या तोंडुन निघते. कायमस्वरुपी वास्तव्य करुन राहाण्यासाठी शरद नगर हेच एकमेव ठिकाण आहे, त्यामुळे फ्लॅट खरेदीदारांची पहिली पसंती शरद नगर हिच असते.

‘ शरद नगर ’ हे मी माझ्या नावासाठी व एका पाहिलेल्या स्वप्नाची पूर्तता करण्यासाठी उभारले आहे. त्यामुळे पैसा कमावणे हा माझा उद्देश नाही. ‘ ना नफा – ना तोटा ’ या धर्तीवर मी अनेकांना फ्लॅट दिले आहेत. मला अनेकजन विचारतात, की “ तुम्हाला एवढ्या कमी किंमतीमधे फ्लॅट विकणं कसं परवडतं ? ” मी त्यांना उत्तर देतो, “ मी शरद नगरची जी जागा खरेदी केली आहे, ती खुप पूर्वी. तेव्हा या माळरानावर काहीही नव्हते. ही जमीनही कुणी खरेदीही करत नव्हते. त्यामुळे जागा स्वस्त मिळाली. मला कुठलेही नाद – छंद नाहीत त्यामुळे माझा इतर वाढीव कुठलाही खर्च नाही. मी

कुणालाही पैसे देत नाही. माझ्याकडुन कुणीही पैसे मागत नाही. त्यामुळे माझा खर्च खुपच कमी आहे. खुप साऱ्या पैशांची हाव मला नाही. त्यामुळे स्वस्तात फ्लॅट विकणं मला परवडतं. माझी इतर कुठल्याही बिल्डरशी स्पर्धा नाही. फक्त माझं स्वत:च्या नावाचं नगर उभारायचं आणि त्या नगरामधे गरीबांनाही फ्लॅट घेता यावेत, हाच माझा उद्देश आहे .

खरं तर शरद नगर उभारताना मी जे – जे संकल्प केले होते, ते – ते सर्व जिद्दीने पूर्ण केले आहेत. नगरामधे प्रवेश करतानाच चांगले प्रवेशद्वार आहे. प्रवेश द्वारावरच स्वप्नपूर्ती गणपती बाप्पाचे मंदिर आहे. अंतर्गत रस्ता चांगला सिमेंट कॉँक्रीटचा आहे. अंतर्गत गटारी बंदिस्त असल्याने गटारीचे पाणी कुठेही रस्त्यावरुन वाहात नाही. पार्किंगची सुविधा आहे. खेळासाठी मैदान आहे. चांगले गार्डन आहे. कार्यक्रमांसाठी यशवंत रंगमंच व जेष्ठांसाठी

लक्ष्मीबाई पार्क आहे. ओपन जीम आहे. चोवीस तास पाण्याची व्यवस्था आहे. निसर्गरम्य वातावरण आहे.

हे नगर शहरापासुन थोडेसे लांब असल्याने शहरातील गजबटापासुन दुर आहे पण शहरातच असल्याने गावाकडच्या आनंदाचा उपभोगही मनसोक्त घेता येतो. वातावरण शांत आहे. रस्त्याच्या कडेला स्ट्रीट लाईट अर्थात विजेची सोय आहे. बसण्यासाठी बाकडे व गझीबो आहेत. मुलांसाठी खेळायला खेळणी व पाळणे आहेत. पूर्ण नगराला CCTV बसवले आहेत. सुरक्षेची पुरेपुर काळजी घेतली आहे. उच्चदर्जाचे बांधकाम केले आहेत. त्यामधे कुठलीही तडजोड केली जात नाही.आम्ही ग्राहकाला एकदा शब्द दिला कि, त्यामधे कधीही दिलेला शब्द खाली पडू दिला जात नाही. आम्ही शब्द देतो, आम्ही शब्द पाळतो, हे

आमचे ब्रिदवाक्य आहे. कुठल्याही ग्राहकाची कधीही फसवणूक होणार नाही, याची आम्ही पुरेपुर काळजी घेतो, त्यामुळे गरीबातल्या गरीब माणसांचाही आमच्यावर विश्वास आहे. म्हणूनच शरद नगर मधेच गरीबातला गरीब माणूस ही त्यांच्या स्वप्नातील घर घेऊ शकतो.

शरद नगर हे आमचे एक कुटूंबच आहे. माझा तर तो श्वास आहे. मला पैसा, मान - सन्मान वा जे काही मिळालं ते शरद नगर मुळेच. मी शरद नगरसाठी जे – जे करायचं ठरवलं होतं ते सर्व काही प्रामाणिकपणे केलं. अखेरच्या श्वासापर्यंत करतच राहाणार आहे. कारण ' शरद नगर ' हीच माझी खरी ओळख आहे. माझ्या या नगरामधे गरीब पण चांगल्या व्यक्तीमत्वाच्या प्रतिष्ठीत व सुसंस्कृत रहिवाशी मंडळींचं मनापासुन स्वागत आहे. ■


स्वप्नपूर्ती कॉम्प्लेक्स, शरद नगर, वाडा.
शरद नगर गार्डन
मुलांना खेळण्यासाठी गार्डन


स्वप्नपूर्ती कॉम्प्लेक्स: नवा प्रकल्प

"बऱ्याच ग्राहकांची तक्रार असते की, बिल्डरने आम्हाला फसवलं. मात्र ज्या दिवशी आमचा एक जरी ग्राहक बोलेल की, **'मला शरद पाटील यांनी फसवलं,'** त्याच दिवशी मी माझा व्यवसाय बंद करेन.

आम्ही आमच्या ग्राहकांना आजपर्यंत दिलेला प्रत्येक शब्द पाळला आहे. **'आम्ही शब्द देतो, आम्ही शब्द पाळतो'** हे आमच्या व्यवसायाचे ब्रिदवाक्य आहे. दिलेला शब्द कधीही मागे घेतलेला नाही. अत्यंत पारदर्शकपणे व्यवहार करुनच विश्वास कमावला आहे."


• **शरद यशवंत पाटील,** बिल्डर.

7433000111

“ **मी एक स्वप्न पाहिलं.** माझ्याच नावाचं एक सर्वांगसुंदर असं नगर उभारण्याचं. त्या स्वप्नांचा प्रचंड मेहनतीने आणि अत्यंत प्रामाणिकपणे पाठलाग केला. असंख्य अडचणी आल्या, संकटं आली पण हार मानली नाही. त्यांच्या छाताडावर उभा राहून लढलो, नडलो, अगदीच भिडलोही. सतत पुढे जात राहिलो. मागे वळूनही पाहिलं नाही.

खिशामध्ये एकही रुपया नसताना निर्धार केला, ग्राहकांचा विश्वास कमावला आणि मी माझं स्वप्न हिमतीने पूर्ण केलं. खरं तर **‘एस टी स्टँड वरचा पोरगा ते बिल्डर’** हा प्रवास खूपच खडतर होता. माझ्यासाठी तर अशक्यच होता. तरीही तो पूर्ण केला आत्मविश्वासाने. त्याच संदर्भातील माझे **‘शरद नगर’** उभारण्याचे अनुभव खास माझ्या जीवाभावाच्या जीवलगांसाठी, माझ्यावर खरं प्रेम करणाऱ्या सर्वांसाठी.”

• **शरद यशवंत पाटील, बिल्डर**

WP 8600001111

